





# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०३.०५.२०२५ | अंक नं. २८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020








## एटीएम कार्डची अदलाबदली करुन ३ लाख ७६ हजार रुपयांना फसवले

नगर - एटीएम मशीनमधून पैसे काढून देण्यास मदत करण्याच्या बहाण्याने एका इसमाने एटीएम कार्डची अदलाबदली करुन ६५ वर्षीय व्यक्तीच्या खात्यातून ३ लाख ७६ हजार १५२ रुपये काढून फसवणूक केल्याची घटना नगर शहरातील जीपीओ चौकातील स्टेट बँकेच्या एटीएम सेंटर मध्ये २७ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत भीमराज रामभाऊ भोज (वय ६५, रा. प्रबुद्धनगर, आलमगीर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे नगर-पाथर्डी रोडवरील जीपीओ चौकातील स्टेट बँकेच्या एटीएम मधून पैसे काढण्यासाठी गेले असता त्यांना एटीएममधून पैसे काढण्यास अडचणी आल्याने तेव्हा ते गोंधळलेल्या अवस्थेत उभे असल्याचे पाहून एक इसम त्यांना म्हणाला की, 'मी तुम्हाला पैसे काढून देतो, एटीएम कार्ड माझ्याकडे द्या', असे म्हणून त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन एटीएम कार्ड घेऊन त्याचा पिन नंबर घेतला आणि हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन एसबीआय बँकेचे दुसरे एटीएम कार्ड त्यांना देऊन पैसे काढण्याचा बहाणा करुन पैसे येत नाही, असे सांगून तिथून निघून गेला. त्यानंतर त्या अनोळखी इसमाने भोज यांच्या कार्डमधून वेळोवेळी वेगवेगळ्या ठिकाणावरुन एटीएमकार्ड द्वारे ३ लाख ७६ हजार १६२ रुपये काढून त्यांची फसवणूक केली. ही बाब निदर्शनास आल्यावर भीमराज भोज यांनी २ मे रोजी सायंकाळी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी एका इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२) ३१८ (४) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे हे करीत आहेत.

## रेल्वे स्टेशनवर पाय घसरुन नगरच्या व्यावसायिकाचा मृत्यू



नगर - सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील श्रुती मिसळ या हॉटेलचे संचालक राहुल येमूल (वय ३६) यांचे २ मे रोजी दुपारी पनवेल रेल्वे स्टेशन येथे अपघाती निधन झाले आहे. राहुल येमूल हे कामानिमित्त मुंबईला गेले होते. तेथून परतत असताना पनवेल रेल्वे स्टेशन येथे रेल्वे गाडीत बसताना ते पाय घसरुन खाली पडले, त्यात त्यांचा मृत्यू झाल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले.

मयत येमूल यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व श्रमिकनगर हौसिंग सोसायटीचे सेक्रेटरी शंकरराव येमूल यांचे ते चिरंजीव होत.









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...






### ललित लेखन – भरलेला पंप असावा

खरी प्रतिभा कधीही पुढेपुढे लुडबुड करीत नाही. आपले ढोल आपणच बडवीत नाही. ती खूप मागे, कुठे तरी सावलीत किंवा दूर गर्दीत उभी असते. प्रदर्शनाचा हव्यासाचा लवलेशही तिच्या ठिकाणी नसतो.

आदरणीय वि. स. खांडेकर म्हणतात की, 'भरलेल्या पिंपापेक्षा रिकामे पंप मोठा आवाज करते हे साहित्यिकांच्याही बाबतीत सत्य आहे.'

ज्यांच्या ठिकाणी प्रतिभा आहे, त्यांना आपल्या या शक्तीची जाणीव असते. ती शक्ती ते मोलाची मानतात. स्वास्थ, प्रेम, मद्य, अहंकार या सर्वांकडे पाठ फिरवून ते आपल्या शक्तीची पूजी करतात. तिचा त्यांना अभिमान असतो, नाही असे नाही. कारण ही शक्ती हजारो माणसांच्या मनांवर परिणाम करते. प्रसंगी ती मने घडविते, याची त्यांना पूर्ण जाणीव असते.

अशा प्रतिभावंतांच्या सौंदर्यकल्पना नित्य विकसित होत जातात, सूक्ष्म बनत जातात. हे प्रतिभावंत आपली कामभावना संयमित किंवा उदात्त करण्याचा प्रयत्न करतात. स्त्रीपासून संसार सुखावह जीवनात जो गोडवा येतो, जो टवटवीतपणा येतो, जी मानवता येते ती त्यांना हवी असते.

एक दोन प्रसिद्ध पुस्तकं किंवा साहित्याचा अभ्यास पुरा केला म्हणजे आपण लेखक होत नाही.

कलावंताच्या जीवनाची प्रत्येक घटका अभ्यासाच्या दृष्टीने मोलाची आहे. सतत प्रयत्न, अखंड वाचन, अहोरात्र चिंतन यांची त्याला जरुरी आहे. उदात्त भावना आणि अनियंत्रित वासना यांच्या मिश्रणाने जीवन बनत असते. त्या मिश्रणाचे खरेखुरे, परिणामकारक अन् अविस्मरणीय दर्शन करून देणे हे ललित साहित्यिकाचे कार्य आहे.

# महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशनचे विविध मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'धरणे आंदोलन'

नगर – रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २००५ साली वित्तीय समावेशकतेचा पुढाकार घेतला याला २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनधन हे नाव देऊन या योजनेला आपल्या सरकारची प्राथमिकता बनवली. हा पुढाकार राबविण्यासाठी बँकांच्या शाखांचे जाळे पुरेसे नव्हते. त्यातच सरकारने ही आपली प्राथमिकता बनवल्यानंतर तर खूपच वेगाने खाती उघडली गेली. या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने, बँकेच्या शाखेला पर्याय म्हणून बँकिंग करस्पाँडंट एका नव्या यंत्रणेला जन्म दिला ज्या द्वारे नवीन खाती उघडली जातील, पैसे भरणे, पैसे काढणे एका मर्यादेपर्यंतचे व्यवहार केले जातील, तर जस जशी जनधन खात्याची संख्या वाढू लागली तसतसे बँक मित्रांची संख्या देखील वाढू लागली. त्यांच्या कामाची व्याप्ती वाढू लागली आणि मग त्यांचे संचालन, व्यवस्थापन करणे बँकांना कठीण जाऊ लागले. यातूनच बँक आणि बँक मित्र यांच्यातील मध्यस्थ सर्विस प्रोव्हायडर आले, आणि बँकांनी ए बन मित्रांची जबाबदारी झटकवली. आज देशात १३.५५ लाख बँक मित्र काम करत आहेत तर सर्व्हिस प्रोव्हायडर ९३५ आहेत. ते ५५.२२ कोटी जन धन खातेदारांना सेवा देत आहेत.



महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशनचे विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

जी खाती उघडण्यात आणि त्यांना सेवा देण्यात बँक मित्रांची भूमिका खूपच महत्त्वाची आहे. आज समाजातील वंचित घटकांना सेवा देण्यात बँक मित्र आधारस्तंभची भूमिका बजावत आहेत पण दुर्दैवाने ते स्वतः मात्र दुर्लक्षित झाले आहेत. त्यांना नियुक्तीपत्र नाही, रजा नाहीत, मेडिकल नाही, सेवेत सुरक्षितता नाही. जोपर्यंत प्रत्यक्ष बँका त्यांची नेमणूक करत होत्या तोपर्यंत त्यांना मिळणारा कमिशनचा दर समाधानकारक होता पण आता सर्विस प्रोव्हायडर आल्यानंतर कमिशनचा दर कमी झाला आहे. त्यांना सेवेत सुरक्षितता नाही. निर्धारित सेवाशर्ती नाहीत. बँक मित्रांना निर्धारित सेवाशर्ती लागू करण्यात याव्यात. बँक आणि बँक मित्र यातील मध्यस्त यांना दूर सारले जावे. बँक मित्रांना किमान मेहनताना दिला जावा ज्यासाठी त्यांच्याकडून किमान निर्धारित काम करून घेतले जावे व व्यवहारासाठी योग्य त्या दराने कमिशन दिले जावे.

यात निर्धारित काळानंतर योग्य ती वाढ करण्यात यावी. बँक मित्रांच्या नेमणुका भौगोलिक सीमा, खात्यांची संख्या, व्यवहार या निकषावर केल्या जाव्यात. बँक मित्र देत असलेल्या सेवांसाठी जागा, वापरत असलेला डाटा, स्टेशनरी, वाहन खर्च याची भरपाई देण्यात यावी. बँक मित्र करत असलेले कार्यालयीन कामकाज यात कायदेशीर किंवा अर्ध कायदेशीर (QUASI LEGAL) विवाद निर्माण झाले तर त्याचा निपटारा करण्याची जबाबदारी बँकेने घ्यावी. बँक मित्र ते करत असलेल्या कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणून पैशांची ने आण करतात. यातील जोखीम लक्षात घेता त्यांच्या मागण्या तातडीने मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉइज युनियन पुणे यांनी पाठींबा दिला असल्याची माहिती ऑर्ग. सेक्रेटरी प्रकाश कोटा यांनी दिली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी यावेळी निवेदन स्वीकारत प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हा प्रतिनिधी श्रीकांत साबळे, भूषण थोरात, नितीन चिखले आदी उपस्थित होते.

## घरासमोरुन बुलेटची चोरी

नगर – घराच्या समोर, रस्त्याच्या कडेला लावलेली रॉयल इनफिल्ड कंपनीची बुलेट मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एक्स १९९४) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना तारकपुर येथील सिंधी कॉलनी येथे घडली. या बाबत मयूर कुंदनलाल कांजन (वय ४३, रा. सिंधी कॉलनी, तारकपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलिस हवालदार शिरसाठ करीत आहे.

# दूध संघाच्या अवसायन प्रक्रियेचा आदेश होत नसल्याने उपोषण

### १७ महिन्यांपासून अंतिम आदेश प्रलंबित; कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी

नगर – अहमदनगर तालुका सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित या संस्थेच्या अवसायन प्रक्रियेला १७ महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही अंतिम आदेश न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वतीने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक येथील कार्यालयासमोर साखळी आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. तर सर्वप्रथम कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.



दूध संघाच्या अवसायन प्रक्रियेचा आदेश होत नसल्याने उपोषणास बसलेले तायगा शिंदे आदी.

१ मे महाराष्ट्र दिनापासून तायगा शिंदे व गजानन खरपुडे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या उपोषणात कुंडलिक देवकर, दत्तात्रय बेकारसे, अशोक डहाने, आप्पासाहेब ढवळे, अशोक धनगर, बाबजी शिंदे, भाऊसाहेब पळसकर, रमेश वायकर, बाबासाहेब चतुर, संभाजी निमसे, कोंडीभाऊ शेळके, बाळासाहेब थोरात, सुनिल निमसे, बाळासाहेब बेरड सहभागी झाले होते.

८ नोव्हेंबर २०२३ रोजी विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक विभाग यांनी संघाला अवसायनात घेतल्याचे अंतरिम आदेश काढले होते. मात्र, कायद्यानुसार एक महिन्याच्या आत अंतिम आदेश अपेक्षित असतानाही आजतागायत तो आदेश न झाल्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये असंतोष पसरला आहे. सदर निर्णयात माजी संचालक मंडळाने संघाचे आर्थिक नुकसान केल्याचे पुरावे असूनही त्यांच्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. उलट, त्यांच्या पाठीशी राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, सध्याचे प्रभारी कार्यकारी संचालक माजी संचालक मंडळाच्या संपर्कात राहून कारवाईस विलंब लावत आहेत. देणी आणि प्रॉव्हिडंट फंड मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे कार्यालयाकडून देण्यात येत नाहीत. एवढेच नव्हे, तर कार्यालयाकडून योग्य माहिती देण्यासही टाळाटाळ होत आहे.

प्रशासनाच्या दिरंगाईमुळे कर्मचाऱ्यांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळत नसून, ही बाब अन्यायकारक आहे. न्यायालय किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून स्थगिती आदेश नसताना, अवसायनाचे अंतिम आदेश प्रलंबित ठेवणे हा राजकीय हस्तक्षेप असल्याचा ठपका कर्मचाऱ्यांनी ठेवला आहे. यामुळे संघातील कर्मचाऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे म्हटले आहे.

## अमरधाम जवळून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – रस्त्याच्या कडेला लावलेली होंडा कंपनीची ॲव्हेटर मोपेड (क्र. एम एच १६ बी एस २९५८) चोरट्याने नजर चुकवून चोरुन नेली. ही घटना नालेगाव अमरधाम येथील नवग्रह मारुती मंदिरा जवळ २ मे रोजी सायंकाळी घडली.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकाश भानुदास आगरकर (रा. झारेकर गल्ली, सबजेल चौक, रिमांड होम जवळ, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार पठाण हे करीत आहेत.

# विधानसभेच्या उमेदवारीसाठी पैसे घेवून इच्छुक महिलेची फसवणूक करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला

नगर – नगर शहर विधानसभेची जागा काँग्रेसलाच मिळवून देण्यासाठी दीड लाख रुपये घेवून इच्छुक महिला उमेदवाराची फसवणूक प्रकरणातील आरोपीचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. याबाबत काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय समन्वयक सौ. मंगल भुजबळ यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष बाळराजे उर्फ श्रीकृष्ण वसंतराव तौर पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सौ. मंगल भुजबळ या विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. त्यांना आरोपी बाळराजे यांनी फोन करून विधानसभा निवडणुकीत नगर शहराची जागा काँग्रेसला सुटणार असून तुम्हाला राष्ट्रवादी शरद पवार गट पार्टीला फंड द्यावा लागेल व त्यासाठी टोकन म्हणून तुम्हाला दीड लाख रुपये द्यावे लागतील. असे सांगून वेळ कमी आहे तुम्ही ताबडतोब मी दिलेल्या बँक खात्यावर दीड लाख पाठवा पैसे खात्यात जमा झाले तरच तुमच्या नावाची चर्चा मीटिंगमध्ये होईल, असे आरोपीने सांगितले. त्यामुळे भुजबळ यांनी जागा काँग्रेसला मिळेल या आशेने आरोपी बाळ राजे यांच्यावर विश्वास ठेवला व आरोपी बाळराजे यांनी सांगितलेल्या राजे जाधव उदयसिंह सत्यजित यांचे नावावर दीड लाख रुपये गुगल पे वर पाठवले. परंतु पुढे फिर्यादी मंगल भुजबळ यांना अहिल्यानगर मतदारसंघासाठी उमेदवारी मिळून न देता त्या मतदारसंघात अभिषेक कळमकर यांना विधानसभेची राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची उमेदवारी देण्यात आली.

फिर्यादी मंगल भुजबळ यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांची फसवणूक झाली असे लक्षात आल्याने त्यांनी आरोपी बाळराजे यांना दिलेल्या दीड लाख रुपये रकमेची ५ नोव्हेंबर २०२४ रोजी मागणी केली असता आरोपीने ती रक्कम देण्याचे टाळले. आरोपीने फिय र्दी मंगल भुजबळ यांची फसवणूक, विश्वासघात केला म्हणून शेवटी भुजबळ यांनी आरोपी बाळराजे विरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशनला १२ मार्च २०२५ रोजी लेखी फिर्याद दिल्याने कोतवाली पोलिसांनी आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२) आणि ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

या प्रकरणातील आरोपी बाळराजे याने अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी क्रिमिनल जामीन अर्ज ४२३/२५ चा जिल्हा न्यायाधीश क्रमांक दोन यांच्याकडे दाखल केला असता ३० एप्रिल रोजी न्यायालयाने उभय बाजूचा युक्तीवाद ऐकून घेऊन व गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन अर्जदार आरोपी बाळराजे याचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायाधीश एम. एच. शेख यांनी नामंजुर केला असून आरोपीला चौकशीसाठी पोलीस कस्टडीची आवश्यकता असल्याचे कोर्ट आदेशात म्हटले आहे. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. सी. डी. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार श्रीनिवास कळमकर यांना जाहीर



नगर – राज्य शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दिले जाणारे कामगार भूषण व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार २०२३ कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी जाहीर केले. कामगार भूषण पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बजाज ऑटो लिमिटेडचे कामगार श्रीनिवास कोंडिबा कळमकर यांची निवड करण्यात आली आहे. ते पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील रहिवाशी आहे.

कामगारांसाठी असलेल्या या सर्वोच्च पुरस्कारासाठी राज्यातून केवळ एका कामगाराची निवड केली जाते. विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी राज्यभरातून ५१ कामगारांची निवड करण्यात आली आहे. नोकरी करत असतानाच विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, संघटन आदी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. दरवर्षी एका कामगाराची कामगार भूषण पुरस्कारासाठी तर ५१ कामगारांची विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी सर्व पुरस्कार्थींचे अभिनंदन केले आहे. हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे येत्या १३ मे रोजी या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कामगार भूषण पुरस्कारासाठी ५० हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरवण्यात येते, तर गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारासाठी २५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र प्रदान करण्यात येते.

## फोटोग्राफर नंदकुमार पुप्पाल यांचे निधन

नगर – ब्राम्हणगल्ली, अहिल्यानगर येथील रहिवासी ज्येष्ठ आर्मी



फोटोग्राफर नंदकुमार ज्ञानदेव पुप्पाल (वय ७३) यांचे २ मे रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अनुप पुप्पाल व अंकिता खानविलकर यांचे ते वडील होत.

# बांधकाम साइटवरुन इलेक्ट्रिक फिटिंग वायरची चोरी; एकाला पकडले, एक पसार

नगर – सावेडी परिसरात हॉस्पिटलचे बांधकाम सुरु असलेल्या साईट वरुन ४० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक फिटिंगची वायर चोरुन नेणाऱ्या चोरट्यास वॉचमनने पकडले. यावेळी चोरट्याचा एक साथीदार तेथून पसार झाला. ही घटना सावेडी परिसरातील आंबेडकर भवन जवळ २ मे रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास घडली.

याबाबत वॉचमन दिलीप लक्ष्मण शिंदे यांनी दिलेला फिर्यादीत म्हटले आहे की, सावेडी येथील आंबेडकर भवन जवळ हार्ट बीट हॉस्पिटलचे नवीन काम सुरु असलेल्या ठिकाणी काम करीत असताना सकाळी साडेदहाच्या सुमारास एक इसम बांधकामाच्या इलेक्ट्रिक वायर कटरच्या सहाय्याने कट करताना दिसून आला. त्यास तू इथे काय करतोस अशी विचारणा केली असता त्याने मी काम शोधण्याकरता आलो आहे. असे म्हणून त्याच्या जवळील वायर कट करण्याचे कटर बांधकामाच्या खिडकीतून बाहेर फेकून दिले.

त्याच्यावर संशय आल्याने त्याच्याकडे चौकशी केली असता तो तेथून पळून जाऊ लागला, तेव्हा वॉचमनने त्यास पकडून त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आदित्य बाळू उबाळे (रा. भाना हॉटेल शेजारी, सावेडी) असे सांगून माझा दुसरा साथीदार विशाल विजय वाघमारे (रा. सावेडी नाका, अ.नगर) हा दुसऱ्या मजल्यावर आहे. असे सांगितले. वॉचमनने तेथे पहिले असता तो तेथून पळून गेला. वॉचमन शिंदे यांनी हा प्रकार डॉ. चंद्रकांत कदम यांना सांगितला. त्यांनी येऊन बांधकामाची पाहणी केली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलीप शिंदे यांनी दिलेले फिर्यादीवरुन आदित्य उबाळे व विशाल वाघमारे यांच्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहायक फौजदार गोरडे करीत आहेत.

## चंपाबाई भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – सारसनगर सावी हॉस्पिटल जवळील रहिवासी श्रीमती चंपाबाई चांदमल भंडारी (स्टेशनरीवाला, वय ९८) यांचे २ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे, पणतु असा परिवार आहे. भंडारी स्टेशनरीचे बाबुशेठ, राजेंद्र, प्रविणकुमार भंडारी, सौ. मीना मुनोत व सौ. कांचन पिपाडा यांच्या त्या मातोश्री होत.

## पोपटलाल भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – आगरकर मळा येथील रहिवासी पोपटलाल चांदमल भंडारी (वय ९३) यांचे ३ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संतोष, विनोद, प्रमोद भंडारी यांचे ते वडील होत.

# अरुणकाका जगताप यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

नगर – विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून दोन वेळा आमदारकी भूषवलेले अरुणकाका जगताप यांच्या पार्थिवावर २ मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास नगरच्या अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी हजारो काका प्रेमींनी साश्रू नयनांनी शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप दिला.




माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या पार्थिवावर २ मे रोजी सायंकाळी अंत्यसंस्कार झाले. यावेळी हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रातील हजारो नागरिक उपस्थित होते. राज्य शासनाच्यावतीने क्रीडामंत्री दत्ता भरणे यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रांताधिकारी सुधीर पाटील व तहसिलदार संजय शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण केले. पोलिसांनी शोक धून वाजवल्यावर बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून मानवंदना दिली.

मागील सुमारे महिनाभरापासून आजारपणामुळे अरुणकाका जगताप यांच्यावर पुण्याच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. २ मे रोजी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यानंतर दुपारी त्यांचे पार्थिव भवानीनगर येथील घरी आणण्यात आले. यावेळी अनेकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. सायंकाळी चारच्या सुमारास फुलांनी सजवलेल्या रथातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी 'अरुणकाका अमर रहे...' अशा घोषणा दिल्या जात होत्या. गुणे आयुर्वेद महाविद्यालयात काही काळ पार्थिव अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आले होते.. त्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास अमरधाम मध्ये अंत्य संस्कार करण्यात आले. यावेळी अमरधाम मध्ये मोठी गर्दी झाली होती. यावेळी झालेल्या शोक सभेत अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहताना अनेकांनी त्यांच्या विषयीच्या आठवणींना उजाळा दिला.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर होईल पॅरालिसीस

हल्ली पॅरोलिसिस अटॅक येण्याचा धोका वाढत आहे. पण हा धोका काही खास लोकांना जास्त असतो. अर्धे कच्चे शिजलेले मांसाहारी पदार्थ जास्त दिवस खाल्ल्यास पॅरालिसीसचा धोका वाढतो. त्याचप्रमाणे खूप जास्त मिठाचे सेवन केल्यानेही ब्लड प्रेशर वाढते. जंकफूड, फास्ट फूड खात असाल तर याने रक्तात फॅट वाढू शकते. जर तुम्ही जास्त प्रमाणात धूम्रपान, तंबाखू आणि दारू पित असाल तर स्ट्रोकचा धोका वाढतो. यावर उपाय म्हणून ब्लड प्रेशर आणि साखर नियंत्रणात ठेवा, भरपूर पाणी प्यावे आणि अवयव क्रियाशील ठेवण्यासाठी हलका व्यायाम करावा.

## पाककला

### पुदीना कैरी चटणी

**साहित्य :** १ वाटी पुदिन्याची पाने, १/२ कच्च्या आंब्या, थोडी कोथिंबीर, १ चमचा भाजलेले जिरे, चार, पाच हिरव्या मिरच्या, १ छोटा तुकडा आले, चवीनुसार मीठ, १/२ टिस्पून काळे मीठ, १ टिस्पून साखर, गरजेनुसार थोडे पाणी,

**कृती :** प्रथम दोन तीन वेळा पुदिन्याची पाने कोमट पाण्यात धुवून नंतर काड्यांपासून वेगळे करा. आणि कच्च्या आंब्याचे आवरण काढून अर्धे चिरुन घ्या. नंतर मिक्सरचे ब्लेंडर घेऊन त्यात एक वाटी स्वच्छ पुदिन्याची पाने, काही कोथिंबीर, चिरलेली कच्ची कैरी, एक चमचा भाजलेले जिरे, चार, पाच हिरव्या मिरच्या, एक छोटा तुकडा आले, मीठ, काळे मीठ, साखर आणि गरजेनुसार थोडे पाणी घाला. नंतर बारीक पेस्ट प्रमाणे छान मिक्स करा. बरणीतुन काढा आणि भजीबरोबर सर्व्ह करा.

## सौंदर्य

### बनवा नॅचरल हेअर डाय

केमिकलयुक्त हेअर डाय वापरल्याने केस जास्त पांढऱ्या केसांचे प्रमाण जास्त आणि काळ्या केसांचे प्रमाण कमी दिसू लागते. चहा-कॉफीच्या पाण्यात किसलेले बीट उकळवा आणि नंतर त्यात २ ते ३ चमचे हळद मिसळा. यानंतर मेहंदी नील पावडर घ्या आणि ती फिल्टर केलेल्या पाण्यात मिसळा आणि पेस्ट तयार करा. नंतर ५ मिनिटे झाकून ठेवा. ५ मिनिटानंतर या द्रावणात अर्धा लिंबाचा रस आणि चिमूटभर मीठ मिसळा आणि केसांच्या मुळांपासून शेवटपर्यंत लावा. १ तासानंतर तुमचे केस काळेभोर तपकिलरी दिसू लागतील.

## सल्ला

टाकीतील पाणी थंड ठेवण्यासाठी टाकीला धान्याचे रिकामे पोते दोरीच्या मदतीने बांधा. या पोत्यावर रोज सकाळी पाणी टाकले तर टाकीतील पाणी सुद्धा थंड राहते तर टाकीचे झाकण गरम होऊ नये म्हणून कार्डबोर्ड झाकणावर ठेवावे.

## वास्तू

गुप्तदान हे संपत्ती मिळविण्याच्या खात्रीशीर मार्गांपैकी एक आहे. गुप्तपणे मीठ दान केल्याने आर्थिक समस्या दूर होण्यास मदत होते. कोणत्याही सामुदायिक स्वयंपाकघरात अथवा भंडाऱ्यामध्ये मीठ दान करणे खूप शुभ मानले जाते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ४ मे २०२५

**भानुसप्तमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, पुष्य १२।५४, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** – पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल. दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल.

**वृषभ** – उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. मनोरंजनात वेळ जाईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल वेळ आहे.

**मिथुन** – खासगी कामाकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. जुने मित्र भेटतील. वैवाहिक सुख वाढेल.

**कर्क** – शत्रुपक्ष हावी राहील. सारखी तीच तीच चुकी होईल. मन रमणार नाही. व्यावसायिक अडचणी सतावतील. मातृचिंता सतावेल. आरोग्य उत्तम राहिल. धार्मिक भावना वाढेल.

**सिंह** – मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**कन्या** – अडकलेला पैसा मिळेल. शुभ कार्ये होतील. गैरसमज दूर होतील. दिवस आनंदात जाईल. मानसन्मानात वाढ होईल.

**तूळ** – आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी पगारवाढीचे योग.

**वृश्चिक** – आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. नवीन ओळखी संभवतात. म ानसन्मानात वाढ होईल. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील.

**धनु** – संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या क्रोधावर संयम ठेवल्याने इतरांबरोबर वाद होणार नाहीत.


**मकर** – नवीन कार्य सुरू कराल. विरोधकांपासून दूर रहाल. यश लवकर मिळणार नाही मात्र मागील केलेली सत्कृत्ये आज फळास येतील.

**कुंभ** – आर्थिक आणि सामाजिक कामांमध्ये अडथळे येतील. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल. भावांचे सहकार्य लाभेल.

**मीन** – अडकलेला पैसा मिळेल. भूमि, घर विकत घेण्याचे योग. आरोग्यात सुधारणा. पितृचिंता जाणवेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१६९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१६८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) आनंद देणारे स्थळ; इंद्राच्या नगरीतील वैभव ४) एक मराठी आडनाव ६) नवऱ्याचा भाऊ ७) पश्चिम दिशा ८) जंगलाचा राजा; सिंह; केसरी ११) केळी पिकण्यासाठी प्रसिद्ध असलेला उत्तर महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध जिल्हा १२) एक पक्षी १४) दडपण; दाब; वजन १५) अंदाज; कयास; अनुमान १६) जीवित; पाणी; उमर १८) चिलखत; आवरण; टरफल १९) चिंता; काळजी २०) खिडकी; वातायन; झरोका २१) अंदाज; अनुमान; अदमास

**उभे शब्द :-** १) एक प्राणी; महादेवाचे वाहन २) पसरलेला सुगंध ३) मुस्लिम ांची प्रार्थना ४) विध्वंस; नासाडी ५) कामदेवाची पत्नी ९) एक मोठे चर्मवाद्य १०) पुरुषाच्या नावापुढे लावतात तो सन्मानदर्शक शब्द; श्रीमंत ११) चिनी मातीच्या पेल्यात पाणी घालून त्यातून सप्तस्वर काढणारे वाद्य १२) एक सुगंधी लाकूड व त्याचे झाड १३) कमी वेळेत; जलदी १६) प्राण; चेतना; जंतू वगैरे १७) दरारा; धाक; जरब १८) विभाग; दालन; खोली १९) गुच्छ; झुबका

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : योग्य क्षणाची वाट बघण्यासाठी संयम असणे हीच खरी जीवनातील अवघड परीक्षा आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### तिकिटे जमविण्याच्या छंदाचे फायदे काय?

आज लक्षावधी माणसे तिकिटे जमवताना आढळून येतात. हा छंद वाढीस लागला आहे तो गेल्या शंभर वर्षांत. पहिले तिकिट छापले गेले त्याला १९९० मध्ये दीडशे वर्षं पूर्ण झाली आहेत. बरीच माणसे हा छंद वेगवेगळ्या उद्देशाने जोपासतात, असे आढळून आले आहे. काहीजण केवळ छंद म्हणून तिकिटे जमवतात, तर काही त्यातून फायदा मिळावा म्हणून तिकिटे जमवतात. जुनी आणि दुर्मीळ तिकिटं खूप महाग असतात.

भारतीय संस्थानांच्या दोन पैसे नि एक आण्याच्या तिकिटांची किंमत आज हजार रुपयांपर्यंत मिळते. विशेषतः बुंदी संस्थानाच्या तिकिटांना खूपच मागणी आहे. चुकीच्या पद्धतीनं छापलेल्या तिकिटांना प्रचंड किंमत मिळते.

इंग्लंडमध्ये ब्रिटिश युवराज चार्लस् व डायना यांच्या विवाहप्रसंगी काढलेली खास तिकिटं, आशियाई खेळांसाठी काढलेली भारतीय तिकिटं अशा खास तिकिटांना खूपच मागणी असते.


## जडत्व

काही पारध्यांनी एका शेतात काही हंस व बगळे पाहिले. मग त्यांनी लपत लपत येऊन त्यांवर एकदम हल्ला केला.

त्यावेळी बगळे हलक्या अंगाचे आणि चपळ असल्यामुळे ते तात्काळ उडून गेले, परंतु हंस जड अंगाचे असल्यामुळे त्यांस वेळेवर उडता आले नाही व त्यामुळे ते पारध्याच्या हाती सहज सापडले.

तात्पर्य : जडत्व किंवा आळस हा फार अपायकारक आहे, तो आपल्या अंगी कधीही जडू देऊ नये.

## रहमते दर्शन (भाग – १)



### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

प्यार और मोहब्बत से भरी हुई नज़र ने मुझे अपने कदमों में बुला लिया था । मेरी धर्मपत्नी का विश्वास

मैं पहली बार महाराज जी से मिलने अकेला ही गया था।

जब रहमत लेकर घर पहुँचा तो खुशी से प्यार, मोहब्बत और रहमत की बातें अपनी धर्मपत्नी और बच्चों को सुनाने लगा। मेरी पत्नी का कहना था कि मैं नहीं मानती। मेरा मुर्शिद तो इतने कद काठी वाला और बेहद ख़ूबसूरत था, जब कि इनका कद छोटा सा और रंग साँवला है। वो इतना बड़ा शरीर इतनी छोटे शरीर में कैसे समा सकता है? गुरु महाराज की दया से मेरी एक महीने की training दिल्ली में होनी थी। महाराज जी ने अपने सरकारी घर में मुझे रहने के लिए कहा और मैं वहाँ एक महीने के लिए रहा। जैसे माँ– –बाप अपने बच्चों की देखभाल करते हैं, वैसे ही मेरी देखभाल उन्होंने की। हुजूर के दफ़्तर चले जाने के बाद ज़्यादा समय पूज्य माता जी के चरणों में गुज़रता । हुजूर महाराज जी की ज़िन्दगी के बारे में माता जी बेहतरीन वाक़िये बताती रहती थीं। शनिवार और इतवार को मुझे सेवा के लिए कहीं न कहीं पंजाब भेजा जाता था। जब १० दिन की training रह गई, तो मैंने नसीब (मेरी पत्नी) को अपने साथ दिल्ली चलने को कहा । हम लक्ष्मीबाई नगर आ गये और एक हफ़्ते में मुझे महाराज जी ने पठानकोट भेज दिया और नसीब महाराज जी के यहाँ रह गई।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

इस चक्र पर ध्यान लगाने से विटामिन डी उत्पन्न होता है जिस से हड्डियां मजबूत होती हैं। जिन बच्चों को सूखा रोग हो जाता है अगर उनके इस चक्र पर तरंगे दी जाये तो वे ठीक हो सकते हैं। ऐसे ही जिनकी हड्डियां कमजोर हैं वह भी इसी चक्र पर ध्यान लगाये तो वह ठीक हो जायेगें।

सुरक्षा –

इसे सुरक्षा चक्र भी कहते हैं। जब स्थूल शरीर में, सूक्ष्म शरीर में, मन में वा आध्यात्मिक जीवन में विघ्न आते हैं यह चक्र उन की रक्षा करता है। ऐसे ही कोई भी रोग हो जाये उस से सुरक्षा करता है।

### स्वाधिष्ठान चक्र

कोई भी चीज हमारे हित के विरुद्ध घटती है तो यह चक्र हमारी रक्षा करता है। मान लो हमें शीन्क आती है तो यह चक्र उस से भी हमें बचाता है। रोग चाहे कितने पुराने या पेचीदा हों वह इस चक्र पर ध्यान लगाने से ठीक हो जाते हैं। कर्मज रोग अर्थात वह रोग जो मनुष्य को जन्म से ही होते हैं वह भी ठीक हो जाते है। इस चक्र पर ध्यान लगाने से रक्त शुद्ध होता है तथा पाचन शक्ति बढ़ती है। हर प्रकार का वायरस नष्ट होता है। मस्तिष्क में चुम्बकीय शक्ति की वृद्धि होती है जो एक अनूठी चीज है। हमारे चारो तरफ का आभामंडल बहुत शक्तिशाली हो जाता है। श्वेत प्रदर यानी ल्यूकोरिया के रुप में जो द्रव्य बाहर निकलता है, यह कमजोर हड्डियों की निशानी है, सूर्य प्रकाश की कमी की निशानी है। इस चक्र पर ध्यान लगाने से यह ठीक किया जा सकता है। मणिपुर चक्र पर अभ्यास प्रतिदिन करना चाहिये नहीं तो लाभ कम होता है। कम से कम ३ मिनिट जरूर अभ्यास करना है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास – ‘भूतकाळ...’

काही दिवसांपूर्वी एका मित्राच्या घरी गेलो होतो. घरातील जुन्या, नव्या वस्तुंची आवराआवर, साफसफाई तो आणि त्याची पत्नी करत होते. मी घरात बसलो. त्याने, त्याच्या लग्नाचा फोटो अल्बम मला दाखवला. साखरपुडा, हळदीचा कार्यक्रम, लग्न समारंभातील विधी, मित्र-नातेवाईक - पाहुण्यांसोबतचे फोटो दोघांनी मला दाखवले. काही फोटो काढतांना ज्या गंमती झाल्या त्या हसुन दोघांनी सांगितल्या. भुतकाळात ते दोघेही कसे होते? घरातलं वातावरण कसं होतं ह्यासह ते दिवस खरंच खूपच छान, एकमेकांसोबत आपण संवाद साधायचो, संपर्कात राहायचो. एकमेकांच्या घरी आवर्जुन यायचो-जायचो हे सारं त्याने खुपच सविस्तरपणे सांगितलं. दैनंदिन जीवनातल्या काही कटु आठवणी सांगितल्या. काही मित्रांनी स्वार्थासाठी कसा उपयोग करुन घेतला ह्याविषयी सांगतांना तो रडु लागला. एखादी व्यक्ती पैश्यांसाठी किती खालच्या पातळीला जाऊ शकते हे त्याने, व्यक्तीच्या नावासह सांगितलं तेव्हा माझ्या लक्षात आलं एखाद्याकडे बंगला, चारचाकी, नोकर, भरपूर बँक बॅलन्स आहे म्हणजे तो स्वभाव, मनाने शुध्द असेलच असं नाही. म्हणजे अगदी, अत्यंत जवळच्या व्यक्तीलाही म्हणजे भाऊ, बहिण, भाचा, पुतण्या ह्या रक्तनात्याच्या व्यक्तींनाही फसवु शकतो स्वार्थासाठी. काय, कधी आणि का महत्वाचं आहे ? ह्याचा विचार करणं प्रचंड गरजेचं आहे हे माझ्या लक्षात आलं. त्याच्या भूतकाळातील एक छानशी आठवण त्याने मला सांगितली. ’ मी अनाथ. एका व्यक्तीने मला दत्तक घेतलं. शिकवलं. पोटच्या लेकरासारखं मला त्याने जपलं, सांभाळलं, वाढवलं. त्याचा व्यवसाय कसा करायचा त्याने मला शिकवलं.

मी सुध्दा मन एकाग्र करुन अर्थातच शिकलो. जिद्द आणि चिकाटीने व्यवसाय केला. जवळच्या काही व्यक्तींनी अगदी हात जोडून विनंती करुन माझ्याकडून वस्तु नेल्या. नंतर पैसे द्यायला आले नाहीत. शेवटी मी हात जोडुन, विनंती करुन पैसे वसुल केले. फार भयानक वागतात काही व्यक्ती हे सांगायला तो विसरला नाही.

खरं तर भुतकाळ अर्थात घडुन गेलेली घटना, गेलेली वेळ. भुतकाळातल्या चांगल्या आठवणीत नक्कीच रममाण झालं पाहिजे तर भुतकाळातल्या ज्या घटनेमुळं आपल्याला दुःख झालं त्यांचा उल्लेख टाळलेलाच बरा. घडुन गेलेली घटना, निघुन गेलेली वेळ आपण बदलवु शकत नाही. ह्याऐवजी येणाऱ्या वेळेचा आपल्याला कसा उपयोग अर्थात चांगला उपयोग करता येईल ह्याविषयी विचार, कृती केलेली नक्कीच चांगली.

भुतकाळात काही व्यक्तींनी कठोर परिश्रम घेऊन प्रतिकुल परिस्थितीवर मात केलेली असते. आज ते आर्थिकदृष्ट्या सक्षम असतात. त्यापैकी काहींना ही जाण असते तर काहीजण ते वाईट दिवस विसरुन आज स्वतःच्या मर्जीनुसार, स्वतःला हवं तसं वागतात हे नक्कीच योग्य नाही. भुतकाळात ज्या चुका केल्या अथवा चुका झाल्या असतील त्या चुकांची पुनरावृत्ती होता कामा नये. भुतकाळातल्या घटनांकडे, सहवासात असलेल्या व्यक्तींकडे, स्थळांकडे आपण गाईड म्हणून पाहिलं पाहिजे. भुतकाळाकडे दिशादर्शक म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येकाचा भुतकाळ एकसारखा नसतोच. भुतकाळात मी विशिष्ठ वेळी असंच का वागलो ? तसंच का वागलो? तो असाच का वागला माझ्याशी? तो तसाच का वागला माझ्याशी? हे प्रश्न आज उपस्थित कडरुन काहीही फायदा होणार नाही. एवढंच म्हणता येईल की मी किंवा तो तसाच वागला कारण ती त्या क्षणांची गरज होती. कदाचित ती गरज स्वार्थीही असु शकते. भुतकाळात मी अमुक एक चांगली गोष्ट अथवा कृती करत होतो ती आजही करत असेल तर नक्कीच चांगलं आहे. अथवा भूतकाळात काही कारणास्तव मी एखादी चांगली कृती करु शकलो नसेल तर आत्ता सदर चांगली कृती लगेच सुरु करायला पाहिजे. खरं तर आपला वर्तमानकाळच ठरवत असतो आपला भुतकाळ कसा होता? वर्तमानात पैश्यांची बचत करण्याची सवय लागली तर नक्कीच चांगलं असेल, आपण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ. भुतकाळाला गुरु मानुन पुढं जाणं अर्थातच चांगल्या अर्थाने पुढं जाणं आपण नक्कीच करु शकतो. प्रत्येकाचा भूतकाळ, काही सांगण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करत असतोच. आपण ते सांगणं, शिकवणं समजुन घेऊन वाटचाल करायची. स्वतःची काळजी घ्या. भूतकाळातल्या आनंददायी, प्रेरणादायी व्यक्ती, विचार आठवत रहा. ह्याच भुतकाळातल्या चांगल्या घटना, कृती, व्यक्ती, विचार आपलं भविष्य उज्वल करणार आहेत. भुतकाळाकडे अनुभव म्हणून आपण पाहाणं महत्वाचं आहे कारण अनुभव हा आपला गुरु आहे. आज भुतकाळातल्या चांगल्या घटना, कृती, विचार, व्यक्ती आठवण्याचा प्रयत्न करा.

(लेख क्र.५४८)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

एसटीत बसलेल्या कॉलेजातील मुलीला कंडक्टर म्हणाला, ‘‘बाळा या मोबाईलमुळे तू तुझ्या आयुष्यात अजून खूप पुढे जाशील’’ मुलगी म्हणाली, ‘‘अरे व्वा काका, पण कसे काय?’’ कंडक्टर म्हणाला, ‘‘कारण बाळा, तुझा स्टॉप मागे जाऊन दीड तास झालाय.’’

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* सायबर गुन्हा कशावरुन घडतो?

– गुगल, युट्यूब, संगणक

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

२) स्तन कोमट पाण्याने धुवावेत व त्यानंतर स्वच्छ सुती कापडाने पुसावेत. कोमट पाण्याने स्तन धुतल्याने दुग्धवाहिन्यांतून दूध सुटण्यास मदत होते.

३) दोन्ही स्तनांमधील दूध डब्यामध्ये काढून ठेवावे. हे दूध बाहेरच्या वातावरणामध्ये आठ तास चांगले टिकते व हे दूध फ्रीजमध्ये ठेवल्यास मा अठ्ठेचाळीस तास टिकते. काला पाजण्याआधी कोमट पाण्यामध्ये थोडा वेळ ठेवावे. म्हणजे आईच्या शरीराच्या तापमानाइतके थोडेसे कोमट झाल्यावर बाळाला पाजावे. हे दूध बाळाला सुतिकेची आई, सासूबाई वाटी-चमच्याने दर दोन-तीन तासांनी पाजतात. ७) दूध पाजण्याआधी वाटी-चमचा पाण्यामध्ये उकळून घ्यावा.

### आयुर्वेदिक बालगुटी


आयुर्वेदामध्ये बालकाच्या आरोग्याचा विचार अतिशय सूक्ष्म पद्धतीने केलेला आहे. बालकाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली व्हावी, बालकाचे आरोग्य चांगले राहावे, तसेच त्याची आजारांविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक असणारी रोगप्रतिकारक शक्ती वाढावी याकरिता काही औषधी द्रव्यांपासून बनविलेली बालगुटी बालकास द्यावयास सांगितली आहे.


**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जल व्यवस्थापन, पाण्याची बचत येत्या काळाची अत्यंत महत्वाची गरज



















**काय उपयोग तुमच्या पैश्याचा ? काय उपयोग तुमच्या धनाचा**
**जर नसेल थेंबही पाण्याचा, म्हणुनच वाचवा थेंब थेंब पाण्याचा.**

**मानवी जीवनातील पाण्याचे महत्व :-**

पाणी म्हणजे जल, नीर, तोय, उदक अंबू, सलिल, जीवन कितीतरी शब्द ! परंतु पाणी म्हणजेच जीवन कारण विश्वातील प्रत्येक सजीवाला जगण्यासाठी पाण्याची गरज असते. पृथ्वीवरील प्रत्येक जीवाचे अस्तित्व हे पाण्यामुळेच आहे. पाणी हे मानवी जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा सुमारे ७१ % भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. यापैकी ९७% पाणी खारे (पिण्यास अयोग्य) आहे. तर ३% पाणी गोड (पिण्यास योग्य) आहे. या गोडया पाण्यापैकी २.६% पाणी हिमनदी व ध्रुवीय बर्फाच्या टोप्यांमध्ये आहे, म्हणजेच फक्त ०.४०% पाणी नद्या व भुगर्भातील स्त्रोतामध्ये जलचरांमध्ये आहे.

**पाण्याचे विविध उपयोग :**

१. पिण्यासाठी : पृथ्वीवरील सर्व जीवांसाठी शुद्ध पाणी पिण्यासाठी आवश्यक आहे.

२. स्वच्छता : पाणी, साफसफाई आणि स्वच्छतेसाठी वापरले जाते. त्याचबरोबर कपडे व इतर वस्तु धुण्यासाठी वापरले जाते.

३. शेती : पाणी शेतीसाठी आवश्यक आहे, विशेषत: पिकांच्या सिंचनासाठी वापरले जाते. ४. उद्योग : अनेक उद्योग व कारखान्यांमध्ये पाण्याचा मोठया प्रमाणावर वापर होतो. ५. ऊर्जा निर्मिती : ऊर्जा निर्मितीसाठी पाणी वापरले जाते.

अशाप्रकारे पाणी संपूर्ण पृथ्वीवरील जीव सृष्टीसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आपल्याला पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि स्त्रोतांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी हे एक मौल्यवान संसाधन आहे. ते मर्यादित प्रमाणात आपणांस उपलब्ध आहे. पाण्याचा गैरवापर व नासाडी केल्याने भविष्यात मनुष्य व इतर प्राणी मात्रास पिण्याच्या पाण्याची भिषण टंचाई व दुर्भिक्ष निर्माण होऊ शकते. त्यामुळे यापुढे सर्वत्र पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने व काळजीपूर्वक करणे अत्यंत गरजेचे आहे.

दैनंदिन जीवनात आपण किती पाणी वापरतो, प्रत्यक्षात किती गरज असते याची पुढील दिलेल्या तक्त्यावरून दररोज आपण पाण्याची किती बचत करू शकतो हे लक्षात येईल.

| अ.क्र. | पाण्याचा वापर कशासाठी | दररोज प्रत्यक्षात वापर-लिटर्स | गरज - लिटर्स | दररोज बचत करणे शक्य - लिटर्स |
|---|---|---|---|---|
| 1 अ.<br>ब. | वॉश बेसिनवर हात धुण्यासाठी नळ चालु ठेवला तर<br>वॉश बेसिनचा नळ गरजेप्रमाणे चालु करून | 5 लिटर<br>- | 1 लिटर | 4 लिटर |
| 2 अ<br>ब | ब्रश करण्यासाठी नळ चालु ठेवल्यावर होणाऱ्या पाण्याचा वापर<br>ब्रश करण्यासाठी नळ चालु बंद करून होणारा पाण्याचा वापर | 2 लिटर<br>- | -<br>0.35 लिटर | -<br>1.65 लिटर |
| 3 अ<br>ब | रेग्युलर टॉयलेट वॉशींसाठी वापरले जाणारे पाणी<br>टॉयलेटमध्ये पाण्याची बचत करणारी फ्लशिंग सिस्टीमद्वारे | 13 लिटर<br>- | -<br>8 लिटर | -<br>5 लिटर |
| 4 अ | रेग्युलर शॉवरने मनसोक्त आंघोळीसाठी वापरले जाणारे पाणी | 90 लिटर | - | - |
| ब | आवश्यक तेवढाच शॉवर वापरल्यास लागणारे पाणी | - | 30 लिटर | 60 लिटर |
| 5 अ<br>ब | पंपाद्वारे गाडी धुण्यासाठी लागणारे पाणी<br>बादली व मग्याने गाडी धुतल्यास लागणारे पाणी | 120 लिटर<br>- | -<br>40 लिटर | -<br>80 लिटर |
| 6 | नळाच्या तोटीतून थेंब थेंब पाणी लिकेजमुळे रोज वाया जाणारे पाणी | 15 लिटर | - | 15 लिटर |

२) अशाप्रकारे दररोजच्या वापरात आपण प्रत्येक जण ठरवले तर किमान ८० लिटर पाण्याची बचत करू शकतो.

**दैनंदिन पाण्याची गरज :**

**१) मानवी जीवनासाठी :** वॉटर सप्लाय सिव्हील (MEPHE) मॅन्युअल प्रमाणे शहरी भागातील राहणीमानासाठी पुढीलप्रमाणे पाण्याची प्रति मानसी प्रति दिन गरज असते. (लिटरमध्ये)

| अ.क्र. | बाबींचे वर्णन | पाण्याची गरज प्रति मानसी प्रति दिन लिटरमध्ये (LPCD) |
|---|---|---|
| 1. | पिण्यासाठी | 3 ते 5 लिटर |
| 2. | स्वयंपाकासाठी | 5 ते 10 लिटर |
| 3. | भांडी धुण्यासाठी व घराची स्वच्छता | 12 ते 25 लिटरर्स |
| 4. | अंघोळीसाठी | 45 ते 90 लिटर्स |
| 5. | कपडे धुण्यासाठी | 25 ते 40 लिटर्स |
| 6. | स्वच्छतागृहासाठी (शौचालय) | 30 ते 40 लिटर्स |

भारतीय मानकाप्रमाणे दररोजची प्रति मानसी प्रति दिन पाण्याची गरज (शहरी भाग) सरासरी १३५ ते १५० लिटर्स असते. तर ग्रामीण भागात प्रति मानसी प्रति दिन पाण्याची गरज ७० लिटर असते. त्याचबरोबर शहरी किंवा ग्रामीण भागातील तरंगत्या (Floating Population) लोकसंख्येसाठी जास्तीच्या पाण्याची गरज लागते. अंघोळीच्या सुविधेसह गृहित धरले तर मानसी प्रति दिन ४५ लिटर्स पाण्याची गरज असते. तर अंघोळीची सुविधा सोडून प्रति मानसी प्रति दिन २५ लिटर्स पाण्याची गरज असते.

**२) विविध संस्थांसाठी दैनंदिन पाण्याची गरज पुढीलप्रमाणे :**

**अ) खाजगी निवासी इमारती सोडून इतर ठिकाणांसाठी**

| अ.क्र. | सार्वजनिक ठिकाण (ईमारतीचे) नांव | पाण्याचा वापर प्रति मानसी प्रति दिन (लिटरमध्ये) |
|---|---|---|
| 1. | कारखाने (अंघोळीच्या सुविधेसह) | 45 Lpcd |
| 2. | कारखाने (अंघोळीची सुविधा सोडून) | 30 Lpcd |
| 3. | दवाखाने (100 बेडस पर्यंत) | 340 Lpcd |
| 4. | दवाखाने (100 बेडस पेक्षा जास्त) | 450 Lpcd |
| 5. | दवाखाना कर्मचारी निवासस्थाने, | 135 Lpcd |
| 6. | हॉस्टेल्स | 135 Lpcd |
| 7. | हॉटेल्स, लॉज (बेडरूमप्रमाणे) | 180 Lpcd |
| 8. | ऑफीसेस (कार्यालये) | 45 Lpcd |
| 9. | उपहारगृहे (प्रत्येक खुर्चीप्रमाणे) | 70 Lpcd |
| 10. | सिनेमा/नाटयगृहे (प्रति सिटप्रमाणे) | 15 Lpcd |
| 11. | शाळा/ कॉलेज<br>अ) दिवसाची शाळा/ महाविद्यालय<br>ब) निवासी शाळा/ महाविद्यालय | 45 Lpcd<br>135 Lpcd |

3) रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, विमानतळ व बंदरे यांची दैनंदिन पाण्याची गरज पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | ठिकाण | अंघोळीच्या सुविधेसह पाण्याची गरज - Lpcd | अंघोळीची सुविधा सोडून पाण्याची गरज - Lpcd |
|---|---|---|---|
| 1. | रेल्वे मार्गावरील मधली स्टेशन्स | 45 Lpcd | 25 Lpcd |
| 2. | रेल्वे जंक्शन्स व प्रमुख मोठी स्टेशन्स | 70 Lpcd | 45 Lpcd |
| 3. | बस टर्मिनल (स्टेशन) | 45 Lpcd | 45 Lpcd |
| 4. | विमानतळ व सागरी बंदरे | 70 Lpcd | 45 Lpcd |

नोट : वरील पाण्याची मागणी ही प्रति मानसी प्रति दिन लिटरमध्ये (Lpcd)आहे.

4) काही प्रमुख उद्योगधंदे (Industries) : यांची दैनंदिन पाण्याची गरज पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| रिफाईनरी | प्रति टन उत्पादनावर | 18200 Litres |
| पेट्रोलियम | प्रति टन (Crude Oil) | 1000 ते 2000 Litres |
| स्टिल उत्पादन | प्रति टन उत्पादन | 200000 ते 250000 Litres |
| थर्मल पॉवर स्टेशन (औष्णीक ऊर्जा केंद्र) | प्रति मेगा वॅट विजनिर्मिती | 3178000 Litres |

**५) शेती व पशुसंवर्धन :**

जगातील बहुसंख्य लोकसंख्येचे पालन पोषण करणारी शेती सिंचनाखाली पाण्यावर मोठया प्रमाणात अवलंबून आहे. पिकांची लागवड, पशुसंवर्धन वाढवण्यासाठी, अन्न सुरक्षा व उपजिवीकेवर थेट प्रभाव टाकण्यासाठी विश्वसनीय जलस्त्रोत (Assured Source) आवश्यक आहेत. बऱ्याच क्षेत्रामध्ये, विशेषतः विकसनशील देशामध्ये, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता ही आर्थिक स्थिरता (Economic Stability) व वाढीसाठी (Growth) एक महत्वपूर्ण निर्धारक (Determiner) आहे.

**जलसंवर्धन ही काळाजी गरज :**

वाढत्या लोकसंख्येमुळे व बदलत्या हवामानामुळे पाण्याचे स्रोत कमी होत आहेत. पाण्याचा योग्य वापर करणे, पाण्याचा पनर्वापर करणे (Recycling) आणि पावसाचे पाणी अडवणे, साठवणे (Rain Water Harvesting) यांसारखे उपाय करणे आवश्यक आहे. ज्यामुळे भविष्यकाळात पाण्याचा पुरवठा सुनिश्चित होईल.

**जलसंवर्धनाच्या काही उपाययोजना :**

**अ) पाण्याचा अपव्यय टाळणे :** अनेक ठिकाणी पाण्याचा अपव्यय होतांना दिसतो. ज्यामुळे पाण्याची उपलब्धता कमी होते. यासाठी पाण्याचा योग्य वापर करणे आणि पाण्याचा पनर्वापर करणे आवश्यक आहे.

**ब) पावसाचे पाणी संकलीत करणे** (Rain Water Harvesting): पावसाचे पाणी अडवून ते साठवून ठेवल्यास पाण्याची उपलब्धता वाढवता येते. ज्यामुळे दुष्काळाच्या काळातही पाण्याची समस्या कमी होऊ शकते.

**क) शाश्वत शेती पद्धती :** सिंचनासाठी योग्य पद्धती वापरल्यास (ठिबक सिंचन) पाण्याची बचत करता येते आणि शेती उत्पादन देखील वाढवता येते.

**ड) सांडपाण्याचा पुनर्वापर** (Recycling) : कारखाने, जलशुद्धीकरण केंद्र, सांडपाणी प्रक्रिया केंद्र इत्यादींच्या वाया जाणाऱ्या सांडपाण्यावर पुनर्पक्रिया करून त्याचा पुनर्वापर करावा.

**इ) लोक जागृतता :** जल संवर्धानाचे महत्व लोकांना समजावून सांगणे आणि त्याबद्दल जागरूकता वाढवणे आवश्यक आहे, ज्यामुळे लोक पाण्याचा योग्य रितीने वापर करतील.

**पाणी बचतीचे काही सोपे दैनंदिन उपाय :**

१. पाण्याचा सुज्ञपणे वापर करा, अनावश्यक अपव्यव टाळा त्यामुळे ऊर्जेची बचत तर होईलच व पाण्याचे बिल सुद्धा कमी येईल.

२. तुमचे डिशवॉशर व कपडयाची वॉशिंग मशीन पूर्ण लोडसह आणि शक्य असेल तिथे ईको सेटिंगवर ठेवा.

३. जमिनीतील हौदामधून इमारतीच्या छतावरील पाणी साठवण टाकीमध्ये भरण्यासाठी मोटारीला सेंसॉर बसवुन चालवा त्यामुळे टाकी भरल्यावर पाणी वाया जाणार नाही.

४. पाण्याचा वापर कमी करणारे (Duel Flush Tank) फ्लश टँक सौचालयामध्ये बसवा. ५. बागेत लॉनसाठी पाण्याचे स्प्रिंकलर बसवा. झाडांना ठिबक सिंचन पद्धतीने व झारीने पाणी द्या. बागेत पालापाचोळा व साल वापरा त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन ७५% पर्यंत कमी होईल.

**जलसंवर्धनाच्या दृष्टीने काही उपाययोजना :-**

१. दुष्काळ सहन करणरी रोपे / झाडे लावा त्यांना जास्त पाण्याची आवश्यकता नसते.

२. छतावरील पावसाचे पाणी एकत्र करून जमिनीतील टाकीत साठवून ठेवून त्याचा पुनर्वापर बागेसाठी व झाडांसाठी करणे. तसेच छतावरील जास्तीचे पावसाचे पाणी बोअर, हातपंप व विहीर पुनर्भरणासाठी वापरणे.

३. गाव शिवारात पडलेले पावसाचे पाणी शिवारातच जिरवण्याचे सुव्यवस्थापन करणे. (माथा ते पायथा).

४. यातून राहिलेल्या पाण्याची नैसर्गिक साठवून क्षेत्रांत (नदी, ओढे व तळे इ.) साठवण करणे. जिथे शक्य आहे तिथे त्याचे एकत्रिकरण करून त्या पाण्याच्या वापराचे सुव्यवस्थापन करणे. ५. भुजल पाणी साठयांचे पाणी साठवून सुक्ष्मतम पद्धतीने पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी, शेती अथवा उद्योगासाठी वापराचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे.

**मित्रहो म्हणूनच**

पाणी हे जिवन आहे, आणि म्हणून त्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पाण्याचा योग्य वापर, पुनर्वापर, पाणी साठवून ठेवल्यास (Rain Water Harvesting) भविष्यासाठी पाण्याचा पुरवठा सुनिश्चित केला जाऊ शकतो. जर आपण सर्वांनी मौल्यवान पाणीसाठा रक्षणासाठीही आपली खुप मोठी मदत होणार आहे त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीचे जीवन सुलभ होईल.



**- Er. Suresh A. Pardeshi** (Ex. AESA President)
Consulting Civil Engineer,
Contractor and Technical Service Provider
Ahilyanagar. Mob No. 9423783220.
Mail id - suresh.pardeshi010@rediffmail.com
Firm : Guruprasad Constructions.
Specialist in : Water tanks,
WTP of Water Supply Scheme.

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर AESA
www.aesanagar.com



जैन धार्मिक परीक्षा बोर्डच्यावतीने १ मे पासून आनंद बाल संस्कार शिबिराला प्रारंभ झाला आहे.

## आनंदधामच्या प्रांगणात आनंद बाल संस्कार शिबीराला प्रतिसाद

नगर – मुलांवर योग्य वयात चांगले संस्कार केल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होवून ते भविष्यात आदर्श बनू शकतात. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या आशिर्वादाने आणि प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने अशीच आदर्श, सुसंस्कारीत पिढी घडविण्यासाठी जैन धार्मिक परीक्षा बोर्डच्यावतीने १ मे पासून आनंद बाल संस्कार शिबिराला प्रारंभ झाला आहे. ६ मे पर्यंत आनंदधामच्या पवित्र प्रांगणात हे शिबिर होणार आहे. सकाळी ७ ते ११ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात जवळपास ६०० मुले–मुली सहभागी झाली आहेतन. आनंदधामचे पवित्र प्रांगण मुला–मुलींच्या किलबिलाटाने गजबजून गेल्याचे पहायला मिळाले.

शिबिरात जैन साधू साध्वींच्या सान्निध्यात मुलांवर धार्मिक संस्कार केले जात असून महान परंपरा असलेल्या जैन धर्माचे मर्म मुलांना अतिशय साध्या–सोप्या भाषेत शिकवले जात आहे. सकाळच्या कोवळ्या उन्हात एकत्र आल्यावर सामूहिक प्रार्थनेने शिबिराचे सत्र सुरु होते. विपुलदर्शनाजी, उदयप्रभाजी, आराधनाजी, पुष्पकंवरजी, विचक्षणाजी, अमितज्योतीजी, विभक्तीजी यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना संस्कारीत केले जाते आहे.

शिबिरात दररोज प्रार्थना, योग प्राणायाम, मेडिटेशन, सामायिक, चौवीसी पठण, गुरूदेवांचे सचित्र चरित्र, मंत्र, मांगलिक असे धडे दिले जातात. याशिवाय स्तोत्र पठण, एरोबिक्स, व्यक्तीमत्व विकास, सामाजिक जागृतीवर प्रबोधन केले जाते. मुलांना दररोज पौष्टिक नाश्ता दिला जातो. युकेजी ते दहावी पर्यंतची मुले मुली यात सहभागी झाले आहेत. दररोजच्या शिबिराच्या सांगते प्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा. यांच्याकडून जैन धार्मिक गीते व मार्गदर्शनाने आणि मांगलिक देऊन होते.

मागील ४० वर्षांपासून उन्हाळ्याची सुट्टी आणि आनंदधाम येथील संस्कार शिबिर असे समीकरण रूढ झाले आहे. सरोज कटारिया, सपना कटारिया, सिमरन मुनोत यांच्यासह आनंद संस्कार शिक्षा अभियानाच्या शिक्षिका, ब्राम्ही युवती मंचच्या सदस्या शिबिराची नियोजन व्यवस्था पाहत आहेत.

## भगवान महावीर कप अंतर्गत ‘बॅडमिंटन स्पर्धा’ उत्साहात



नगर – वाडिया पार्क मैदानावर भगवान महावीर चषक क्रीडा महोत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेली बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात पार पडली. असून गेल्या १६ वर्षांपासून फ्लड लाईट टेनिस बॉल क्रिकेट महोत्सवाने यंदा नव्याने रस्सीखेच, धावणे आणि बॅडमिंटनसारख्या विविध स्पर्धांचा समावेश करून युवकांना त्यांच्या आवडत्या खेळात सहभागी होण्याची संधी दिली आहे. वाडिया पार्क येथील बॅडमिंटन हॉलमध्ये ही स्पर्धा पार पडली. विविध वयोगटांतील युवक मोठ्या संख्येने सहभाग घेत, आपल्या खेळगुणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. खेळाडूंच्या खेळातील चपळता, नेटकेपणा आणि जिद्द पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना प्रोत्साहन दिले.

भगवान महावीर चषक परिवाराचे राजेंद्र गांधी हे म्हणाले की, हे केवळ खेळ नसून सामाजिक सलोखा, एकत्रितपणा आणि युवा शक्तीला दिशा देण्याचा एक सुंदर उपक्रम आहे. वर्षानुवर्षे युवकांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कौशल्यांना चालना मिळावी यासाठी आम्ही ही स्पर्धा आयोजित करतो आहोत. यंदा बॅडमिंटनसारख्या खेळांचा समावेश केल्यामुळे युवकांमध्ये उत्साह ओसंडून वाहतो आहे. स्पर्धेच्या आयोजनात स्वयंसेवक, प्रशिक्षक वर्गानेही योगदान दिले. विजय प्राप्त केलेल्या खेळाडूंना पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे वाडिया पार्क परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी देखील या क्रीडा महोत्सवाचे कौतुक केले आहे.

## पिण्याचे पाणी, फळबागांसाठी कुकडीचे आवर्तन सोडा : खा.निलेश लंके यांची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर–सध्या तीव्र स्वरूपाचा उन्हाळा असून, सर्वच ठिकाणच्या पाण्याचे उगम आटून गेले आहेत. त्यामुळे पिण्याचे पाणी, शेतीसाठीचे व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर कुकडी प्रकल्पातून आवर्तन सोडण्याची मागणी खासदार निलेश लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील पारनेर, श्रीगोंदे, कर्जत तालुक्यांतील शेती पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पावर अवलंबून आहे. कुकडी प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून आहे. या तिन्ही तालुक्यांत माणसांच्या पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

माणसांच्या पिण्याच्या पाण्यासह फळबागांना पाणी, जनावरांच्या पिण्यासाठी पाणी व चाऱ्यासाठी कुकडी प्रकल्पातून पाणी सोडणे अत्यंत गरजेचे आहे. पिंपळगाव जोगा धरणामध्ये उपलब्ध असलेल्या मृत साठ्यातून साडेतीन टीएमसी पाणी कुकडी डाव्या कालव्यात सोडण्याबाबत शासनस्तरावर परवानगीसह आदेश संबंधितांना देण्यात यावेत, अशी विनंती खासदार लंके यांनी या निवेदनात केली आहे.

# शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा

**ॲड. सुनिल मुंदडा यांचे प्रतिपादन**



महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ॲड. सुनिल मुंदडा, डॉ. अशोक दळवी, सागर फुलसौंदर, सौ. उषा दळवी, ग्रामस्थ, पालक, शिक्षकवर्ग व यशस्वी विद्यार्थी आदि.

नगर – अथक परिश्रम व चिकाटी तसेच उत्कृष्ठ मार्गदर्शन मिळाल्यानेच खेडेगांव असुनही अनेक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये सुयश संपादन केले. खरी गुणवत्ता ही ग्रामीण भागात ठासुन भरलेली आहे याची प्रचिती नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत दिसली. एक मेंढपाळ देखील प्रखर इच्छा शक्तीने अभ्यास करुन नेत्रदिपक यश मिळवु शकतो. संविधानाने देखील प्रत्येक मुलास शिक्षणाचा अधिकार दिलेला आहे. पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या प्रयत्न इंग्लिश मिडीयम स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येथील गुणपत्रिका वितरण समारंभ पालक विद्यार्थी मेळाव्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणुन ॲड. सुनिल मुंदडा यांनी प्रतिपादन केले.

प्रारंभी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने विद्यार्थी, पालक, गावकरी व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ. अशोक दळवी यांनी प्रास्ताविक केले आणि संस्थेच्या प्रगतीचा व भविष्यातील विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे आयोजित पुर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या कु. आश्लेषा वाबळे, चि. ऋतुराज जाधव व कु. सृष्टी गागरे या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत सत्कार करण्यात आला. चालु शैक्षणिक वर्षात सुयश मिळविलेल्या अनेक विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व गुणपत्रिकांचे वितरण करण्यात आले यावेळी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी शाळेच्या व शिक्षकांच्या विषयी ऋण व्यक्त करणारे मनोगत सांगितले.

या कार्यक्रमासाठी अहमदनगर येथील विनित ग्राफीक्सचे संचालक सागर फुलसौंदर, सरपंच संतोष मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण वाबळे, डॉ. सचिन जाधव, सोमनाथ मुसळे, बाबासाहेब काळे, संतोष मुसळे, दिलीप मोरे व आजुबाजुच्या परिसरातील अनेक नागरीक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक संदिप खैरे यांनी केले आणि मुख्याध्यापक उषा दळवी यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

# रिल निर्मिती स्पर्धेत अहिल्यानगरमधील कलाकार अशिष त्रिभुवन याला ५० हजारांचे प्रथम पारितोषिक



रिल निर्मिती स्पर्धेत नगर शहरातील कलाकार अशिष त्रिभुवन याला ५० हजारांचे प्रथम पारितोषिक मिळाले.

नगर – शिर्डी येथील वेट न जॉय यांच्यावतीने आयोजित इन्फ्ल्युन्स कॉन्टेस्ट २०२५ या रिल निर्मिती स्पर्धेत नगर शहरातील कलाकार आशिष त्रिभुवन यांना प्रथम क्रमांकाचे ५० हजार रुपये रोख पारितोषिक मिळाले आहे.

आशिष त्रिभुवन हा सामाजिक, धार्मिक व सार्वजनिक सण कार्यक्रमांचे रिल्स बनवतो व समाज–माध्यमातून लोकापर्यंत पोहचवतो. वॉटर पार्कचे आकर्षक चित्रण, त्यास समर्पक असे गीत व रचना बनवून त्याने प्रभावी रिल तयार केले. यासाठी त्याला प्रदीप वाळके, प्रशांत जठार, सारंग देशपांडे, गौरव साळवे, प्रथमेश बेरड, स्वप्नील नजन यांचे सहकार्य लाभले. नगरच्या विविध सार्वजनिक, शैक्षणिक, धार्मिक, व्यावसायिक क्षेत्रातील महत्वाच्या रिल्स बनवून त्याचा फायदा सर्वांना व्हावा असा मानस असल्याचे आशिषने सांगितले.

स्पर्धेतील यशाबद्दल त्याचे मालपाणी ग्रुपच्या डायरेक्टर श्रेया मालपाणी, जय मालपाणी, डॉ. संतोष खेडलेकर, अनुप बजाज, संदीप सदाफळ, सचिन डांगे, गणेश तांबे, योगेश राहणे, साई तीर्थ थीम पार्क, वॉटर पार्कच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सवचा नगरमध्ये ५ मे रोजी शुभारंभ



नगर – महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सवी वर्षाचा शुभारंभ जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या हस्ते आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ५ मे रोजी सायंकाळी ५ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आशिष येरेकर आदी उपस्थित राहणार

महोत्सव समितीचे सदस्य राजाभाऊ मुळे यांनी सांगितले की, पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित एकात्म मानव दर्शन हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मुंबई येथील रुईया कॉलेजमध्ये एकात्म मानव दर्शन हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. या व्याख्यानांना नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्ताने हा विचार सर्वसामान्यांपर्यंत, प्रामुख्याने युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हीरक महोत्सवी वर्ष साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून साजरा होत असलेल्या या हीरक महोत्सवी वर्षाचा राज्यस्तरीय शुभारंभ नुकताच मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला.

ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या विशेष पुढाकारामुळे अहिल्यानगर येथे हीरक महोत्सवी वर्षाचा शुभारंभ ५ मे रोजी होत असून अशा प्रकारे जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रम करणारा अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. अशी माहिती समितीचे सदस्य राजाभाऊ मुळे यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाने समितीचे सदस्य सचिव व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त निशांत सूर्यवंशी आणि समितीचे सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत.

या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



४१५ वर्षितप तपस्वींच्या अविस्मरणीय पारणा महोत्सवानिमित्त आनंद तीर्थ येथे भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

# ४१५ वर्षितप तपस्वींच्या अविस्मरणीय पारणा महोत्सवानिमित्त आनंद तीर्थ येथे भाविकांची गर्दी

नगर – राष्ट्रसंत आचार्य भगवंत गुरुदेव श्री आनंदऋषीजी म. सा. १२५ वी जन्मजयंती निमित्त ३० साधु–साध्वीजी आणि ७५०० हून अधिक भाविक आणि भक्तांच्या उपस्थितीत ४१५ वर्षितप तपस्वींचा वर्षितप पारणा महोत्सव उत्साहात झाला. आचार्य भगवंत आनंदऋषीजी महाराजांच्या पवित्र जन्मस्थान असलेल्या चिचोंडी येथे आनंदतीर्थाच्या पवित्र क्षेत्रात शाही पारणा महोत्सव उत्साहात पार पडला.

या विशाल आणि भव्य प्रांगणात सर्वत्र अनुमोदनेचे स्वर गुंजित राहिले. अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय भगवंत प्रवीणऋषीजी म.सा.च्या सत्प्रेरणेतून २०१३ पासुन वर्षितप पारणा महोत्सवाची चिचोंडी येथे सुरूवात झाली. यंदाच्या पारणा महोत्सवात उपाध्याय भगवंत प्रवीणऋषीजी म.सा. आदि ठाणे २, तरुण तपस्वी मुकेशमुनीजी म.सा. आदि ठाणे, महासती कांचन कंवरजी म.सा. आदि ठाणे, महासती सुनंदाजी म.सा. आदि ठाणे, महासती आदर्श ज्योतीजी म सा., आदि ठाणे, महासती सुप्रियाजी म.सा.आदि ठाणे महासती ओजसदर्शनजी म सा. आदि ठाणे अशा एकूण २७ गुरु भगवानांची पवित्र उपस्थिती आणि आशीर्वाद सर्व तपस्वी आणि गुरुभक्तांना मिळाला.

सर्व गुरु भगवानांनी तपस्वींच्या मान्यतेने अक्षय्यतृतीयेचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले. त्यांनी सांगितले की, या देशात कुटुंब व्यवस्था, सामाजिक व्यवस्था आणि राष्ट्रीय व्यवस्था प्रथम भगवान ऋषभदेव यांनी स्थापित केली होती. भगवान ऋषभदेव हे केवळ इतिहासाचे गायक नव्हते तर इतिहासाचे निर्माते देखील होते. जेव्हा समजावून सांगूनही दुर्जनांनी ऐकले नाही, तेव्हा त्यांना शस्त्रांची भाषा शिकवणारे भगवान ऋषभदेव होते. भारताला हे नाव ऋषभदेवांमुळे मिळाले, पण आज आपण त्याचा अभिमान बाळगायला विसरलो आहोत. उपाध्याय भगवंत यांनी भगवान ऋषभदेव यांच्या जीवनाचे अचूक वर्णन केले.

वर्षितप पारणा महोत्सवाच्या लाभार्थी, परम गुरु भक्त श्रीमती ज्योत्स्नाताई रतिलाल मुथा, कु. नीलम राहुलकुमार मुथा आणि मुथा परिवार (निगडी प्राधिकरण) यांनी सर्वांची श्रद्धेने, भक्तीभावाने आणि अंतःकरणाने पारणा सेवा केली. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि भावनेने संपूर्ण वातावरण भक्तीने भरून गेले. त्यांना गुरु आनंद फाउंडेशनकडून प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आनंद तीर्थाच्या बांधकामात योगदान देणाऱ्या सर्व देणगीदारांचा गुरु आनंद फाउंडेशनने सन्मान केला.

गुरु आनंद फाउंडेशन आणि ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष सतीश सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील १०० हून अधिक सक्रिय कार्यकर्त्यांचा त्यांच्या परिश्रम, समर्पण आणि आनंदतीर्थावरील श्रद्धेबद्दल अभिनंदन करण्यात आले. या पारणा महोत्सवात, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच चेन्नई, बंगळुरू, म्हैसूर, जयपूर, जोधपूर, हैदराबाद इत्यादी प्रांतांमधून तपस्वी, गुरुभक्त आणि भक्तांनी कडक उन्हात दीर्घ प्रवास करीत महोत्सवाला हजेरी लावली आणि गुरुदेवांनी त्यांचे अभिनंदन केले.

# ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला नेतृत्वाची संधी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; मनोरंजन क्षेत्रातील अत्याधुनिक ‘एआय’ तंत्रज्ञान शिक्षणासाठी नवी मुंबई येथे एज्युकेशन सिटी उभारणार

मुंबई – जागतिक स्तरावर मनोरंजनक्षेत्रात ‘एआय’चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे ‘एआय’ तंत्रज्ञानाची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आता ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्राचे जागतिक नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वेव्हज परिषदेदरम्यान महाराष्ट्र पॅव्हेलियन येथे देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज परिषदेचे आयोजन केले आणि त्याचे यजमानपद महाराष्ट्राकडे दिले राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे.

वेव्हज परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने काही अत्यंत महत्त्वाचे सामंजस्य करार (MoUs) केलेले आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा, एनएसईने (NSE) वेव्हज निर्देशांक सुरू केलेला आहे. ४३ कंपन्या, या दृकश्राव्य क्षेत्रातल्या आहेत, या कंपन्यांचा निर्देशांक सुरू झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करत आणि एकूणच फायनान्शियल इकोसिस्टीम तयार करण्याकरिता हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. हा वेव्हज इंडेक्स म्हणजे वेव्हजच्या यशामधला एक मुकुटमणी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूयॉर्क या दोन जागतिक विद्यापीठांसोबत आज सामंजस्य करार केल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत, परदेशी विद्यापीठांना देशामध्ये त्यांचे केंद्र उघडण्याची परवानगी मिळाली असून नवी मुंबई इथे सिडकोच्या पुढाकाराने एज्युसिटी उभारण्यात येणार आहे. या एज्युसिटीमध्ये जागतिक दर्जाची १० ते १२ विद्यापीठे आपले कॅम्पस सुरू करणार आहेत. त्यातील दोन विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात आला. सुरुवातीला दीड हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. पण भविष्यात ही गुंतवणूक वाढत जाणार आहे. आणखी तीन महत्त्वाच्या विद्यापीठांशी चर्चा सुरू आहे. देशातले जागतिक विद्यापीठ एकत्र असलेले पहिले कॅम्पस नवी मुंबईमध्ये सुरू होत आहे.

यासोबत प्राइम फोकससोबत (Prime Focus) सामंजस्य करार करण्यात आला आहे, ज्याच्यामध्ये प्राइम फोकस एक फिल्मसिटी या ठिकाणी तयार करणार आहे, ज्यामध्ये जवळपास ३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून किमान १० हजार लोकांना रोजगार मिळेल. ‘एआय’ (AI) पॉवर आणि जगातली उत्तम तंत्रज्ञानही त्या ठिकाणी असणार आहे.

पनवेल येथे चित्रपट सृष्टी उभारण्यासाठी गोदरेज सोबतही दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. एकूण ८००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### फिल्मसिटी म्हणजे तंत्रज्ञान

फिल्मसिटी म्हणजे लोकेशन नाही, आता फिल्मसिटी म्हणजे टेक्नॉलॉजी असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व तंत्रज्ञानाने परिपूर्ण चित्रपट सृष्टी असेल. तेथे चित्रपट निर्मिती क्षेत्रातील सगळ्या गोष्टींसाठी परिसंस्था असतील. आतापर्यंत आपले लोक तिथे वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्याकरिता प्रयत्न करायचे, मात्र जे लोकं जाऊ शकत नाहीत, त्यांना तेच शिक्षण या ठिकाणी मिळणार आहे. आज वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था जर कुठली असेल, तर ती दृकश्राव्य माध्यमाची अर्थव्यवस्था आहे. सर्वात जास्त रोजगाराची संधी यात असून, या क्षेत्रात भारताला नेतृत्व करण्याची संधी आहे. कारण कंटेंट क्रिएटर्स, कंटेंट वापर, आपल्याकडे सगळ्यात जास्त आहेत. या क्षेत्रात नेतृत्व करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेव्हजमुळे, हे शक्य झाले आहे आणि मुंबई, ही दृकश्राव्य माध्यमाची जणू राजधानीच या संमेलनामुळे झालेली असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# प्रद्युम्न सुडके जिल्ह्यात तिसरा



नगर – अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज आयोजित जिल्हास्तरीय ज्ञानवर्धिनी शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत प्रद्युम्न सुडके याने ३०० पैकी २९० गुण मिळवून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत तिसरा क्रमांक मिळविला. प्रद्युम्न सुडके यास मुख्याध्यापक पोकळे सर व सर्व शिक्षक वृंद, आई सौ. सुमन सुडके, वडील संतोष सुडके यांचे मार्गदर्शन लाभले.




# पंजाबी व सिख समाजातर्फे पुणे येथे ४ मे रोजी वर-वधु परिचय संमेलनाचे आयोजन

नगर – पंजाबी व सिख समाजाच्या तर्फे पुणे येथे वर – वधु परिचय संमेलनाचे आयोजन द् पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे येथे ४ मे रोजी होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी संमेलनाचे आयोजन करण्यात येते व अशी माहिती कश्मीरी नागपाल, अरुण चोपडा, हरिष, किशोर कंत्रोड यांनी दिली आहे.

ज्यांना सदर परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्या सोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे अरुण चोपडा मो.नं. ९६२३११६१७०, संगिता मल्होत्रा मो.नं. ९९२२४२९७१४, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) मो.नं. ८९९९८१२४०८ । ९२२६७८३१०१ हैदराबाद पंजाबी सेवा समिती, उमेश ठकराल ९३४६४३४७८६, ऑफिस – ८१२५७४९९६५. पंजाबी हिन्दू एसोसिएशन जबलपुर होमसाईस कॉलेज रोड, नेपियर टॉउन, जबलपुर ऑफिस नं. ६२६३३०४८००, उमेश खुराना नं. ८०८५९५९८४९, आर के कपुर नं ९१३१५५०७००, सुरत पंजाबी समाज, राधाकृष्ण मंदिर, गेटवे हॉटेल जवळ, पारले पॉईंट, ऑफिस – ८१४००५५५८८, नरेश सेठ ९३७७७२२२००, कैलाश छाबडा ९३७४४२१२८०, अमदाबाद पंजाबी बिरादी, नवरंगपुरा चेरीटेबल ट्रस्ट तर्फे पंजाबी सेवा समाज हॉल, किशोर महेदिरता – ९८२५०३५८२०, कक्कड – ९८२७१८७०८७, ठाकूर खुराना – ९७२४६५९६१६, नागपुर सनातन भवन प्रेमनाथ सहानी ९८२२२०४०५७, नरेंद्र सेठिजा ९८९०३३४७४७ विनय ओबेराय ९४२३१०३९४३, हेमंत सहानी ९८२३०३२५१२१२९, भोपाल पंजाबी समाज, मोहनसिंग कालारा ७०००४३२६०६, शशि वैद – ९३०३०७९४४६ संजीव सचदेव ९४२५००९६३०, पंजाबी सनातन सभा रायपुर छत्तीसगड ऑफिस –९१११००२०९९, यशपाल कपूर– ९९८१०१३४५६, प्रीतम अरोरा – ९८२६३४९३३५, तिलक इंदोर पंजाबी समाज, बलराज सबलोक – ९६४४४७१०८९, श्वेता खत्री ७३५४६१९९६०, विजय ग्रोवर– ९४२५४८०७०९, नाशिक, किरण कालरा – ९४२२७४६६८५, अशोक ग्रोवर – ९५२७४७२४७९, पंजाबी वेलफेअर फौडेंशन, पुणे पिंपरी – हरिष मदान ९३२५६५९१४२, सुरेंद्र वाधवा ८६००८६६०००, लिना सप्रा ९८६०६०७१२७, व किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ पुणे कॅम्प गुरुद्वारा, पुणे विक्रम सिंग कांड – ९९२२९३१८८०, उत्तर प्रदेशचे खत्री समाज चे अध्यक्ष आचल महरोत्रा ९५५५४११०९२, सिंकदराबाद गुरुद्वारा साहेब, नियर रेल्वे स्टेशन जवळ सिंकदराबाद – बलदेवसिंग बग्गा ९८४८०४४४४५, हैदराबाद गुरुद्वारा साहेब बहरमबाला सिख छवणी हैदराबाद सुखदेव सिंग– ९९४९६२२५३, अहिल्यानगर किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदिरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर यांना संपर्क साधा.

या कार्यक्रमात नाव देऊन नातलगामध्ये होणाऱ्या कमी करण्यासाठी व ज्यादा शहर न फिरता एक ठिकाणी येऊनी आपल्या जिवनसाथीची योग्य निवड करता यावी. व आयोजकांना समाजसेवेची संधी मिळावी, अशी माहिती चंद्रकुमार मुनोत, हरीष मदान, मोहन सिंग कालरा, सुरेंद्र वाधवा, अरुण चोपडा, किशोर महेदिरता, नरेंद्र सेतीजा, प्रेमनाथ सहानी, यशपाल कपूर, तिलक कक्कड, नरेश सेठ, विनित अरोरा, किशोर कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, प्रदिप पंजाबी यांच्यावतीने देण्यात येत आहे.















## मुले-महिलांमध्ये अशक्तपणा अधिक

अशक्तपणा म्हणजे रक्ताची कमतरता. ही एक समस्या असून देशातील अनेक महिला आणि मुलांवर तिचा परिणाम दिसतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतात सहा ते ५९ महिने वयोगटातील ५३ टक्क्यांपेक्षा जास्त मुले आणि अनेक स्त्रिया ॲनिमियाने ग्रस्त असल्याचे समजते.

राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण २०१९-२१ नुसार, देशातील ५७ टक्के महिला अशक्त आहेत. ॲनिमिया असणाऱ्या व्यक्तीच्या शरीरात हिमग्लोबिनची कमतरता असते. हिमोग्लोबिन हे रक्तातील प्रथिने असून ते शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पुरवते. असे असताना ते कमी झाल्यास थकवा, अशक्तपणा, चक्कर येणे आणि श्वास लागणे यासारख्या समस्या उद्भवू लागतात.

महिलांना अशक्तपणाचा धोका का?

* मासिक पाळी दरम्यान जास्त रक्तस्राव होत असल्यामुळे महिलांच्या शरीरात लोहाची कमतरता भासू शकते

* गर्भधारणेदरम्यान आणि स्तनपान करताना स्त्रीचे शरीर स्वतःसाठी तसेच बाळासाठी रक्त तयार करते. त्यामुळे लोहाची गरज वाढते.

* बहुतेक महिलांना सकस आहार मिळत नाही. शरीराचे आवश्यक पोषण न झालेल्या महिला ॲनिमियाच्या बळी ठरतात.

जाणून घ्या
**डॉ. मेघा दळे**

* अविवेकी आहारामुळे शरीरात आवश्यक खनिजांची कमतरता निर्माण झाल्यामुळेही अशक्तपणा जाणवू शकतो.

मुलांमध्ये अशक्तपणाची कारणे

* लहान मुले फक्त दुधावर अवलंबून असतील तर त्यांना पुरेसे लोह मिळत नाही आणि हा आजार होतो.

* अयोग्य आहारपद्धतीमध्ये मुलांना चॉकलेट आणि स्नॅक्स मुबलक प्रमाणात मिळतात पण लोह आणि फॉलिक ॲसिडयुक्त अन्न कमी मिळते. परिणामी ही समस्या डोके वर काढते.

* मूल वाढते तसतसे शरीराला अधिक लोहाची आवश्यक असते. मात्र अन्नातून ते मिळत नसल्यास कमतरतेमुळे ही समस्या उद्भवते.

लक्षणे काय?

सतत जाणवणारा थकवा, चेहऱ्यावरील



फिकटपणा, चक्कर येणे, श्वास लागणे, कशावरही लक्ष केंद्रित न होणे, नखे तुटणे, केस गळणे ही या आजाराचे लक्षणे आहेत.

अशक्तपणा टाळण्यासाठी उपाय

लोहयुक्त पदार्थ खा. पालक, बीटरूट, डाळिंब, गूळ, कडधान्ये, सुका मेवा, सोया, मासे आणि अंडी यांचा आहारात समावेश करा. व्हिटॅमिन सी युक्त आहार घ्या. त्यासाठी लिंबू, संत्री, आवळा यांचा आहारात समावेश करा. त्यामुळे शरीरात लोह लवकर शोषले जाते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लोह आणि फॉलिक ॲसिडच्या गोळ्या घ्या. विशेषतः गर्भधारणेदरम्यान याचे महत्त्वाचे आहे. सतत थकवा किंवा दम लागत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने रक्ताची तपासणी करून घ्या. मुलांना सकस अन्न खाण्याची सवय लावा. त्यांच्या आहारात हिरव्या भाज्या, धान्ये आणि फळांचा समावेश करा.

## लग्नानंतर जोडप्यात नैराश्य का?

लग्न एकत्र राहण्याची, आनंद वाटून घेण्याची आणि एकमेकांना समजून घेण्याची सात वचने असतात. पण अनेक जोडप्यांचे लग्नानंतरचे आयुष्य अवघड होऊन बसते. खरे तर लग्नानंतर सर्व काही परफेक्ट व्हायला हवे; पण अचानक तुमचा मूड खराब होतो, छोट्या छोट्या गोष्टींवरून चिडचिड होते किंवा एकटेपणा जाणवतो तेव्हा समजून घ्या, की हे लग्नानंतरचे नैराश्य आहे.

लग्नानंतरच्या नैराश्याची कारणे

* जबाबदाऱ्यांमध्ये अचानक वाढः लग्नानंतर दोघांनाही घर सांभाळणे, आर्थिक नियोजन, नातेवाईकांशी समन्वय साधणे इत्यादी अनेक जबाबदाऱ्यांना सामोरे जावे लागते. यातून नैराश्य येते.

* वैयक्तिक स्वातंत्र्य गमावणेः लग्नानंतर जीवनशैलीत बदल होतो. उशिरा झोपणे, मित्र-मैत्रिणींना भेटणे किंवा स्वतःसाठी वेळ काढणे कमी होते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधित वाटू शकते.

* जोडीदाराकडून अपेक्षा आणि वास्तव यातील फरकः काही जोडप्यांना लग्नाआधी एकमेकांकडून खूप अपेक्षा असतात. पण लग्नानंतर परिस्थिती तशी झाली नाही तर निराशा वाढू शकते. अपेक्षापूर्ती अभावी नात्यात कटुता, नैराश्य यासारख्या समस्या उद्भवू शकतात.



* मानसिक अंतरः अनेक वेळा जोडपी आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करत नाहीत. त्यामुळे गोष्टी मनात साचत राहतात आणि तणाव वाढतो.

* नवीन कुटुंबाशी जुळवून घेण्याचे आव्हानः विशेषत: महिलांसाठी नवीन कुटुंब, नवीन चालीरीती आणि वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेणे सोपे नाही. त्यामुळे मानसिक समस्यांमध्ये वाढ होऊ शकते. कधी कधी हीच बाब नैराश्याचे रूप घेते.

आरोग्यविशेष
**डॉ. कुंदन गायकवाड**

नैराश्य टाळण्यासाठी टिप्स

* हे टाळण्यासाठी स्पष्ट संभाषण ठेवा. मनातील भावना जोडीदाराशी शेअर करा. काय चांगले वाटते, काय वाईट वाटते यावर उघडपणे सांगा. त्यामुळे गैरसमज टाळता येतील.

* थोडा 'मी टाइम' देखील आवश्यक असतो. लग्न म्हणजे तुम्ही ओळख गमावणे असा होत नाही. तेव्हा पुस्तक वाचणे, फिरायला जाणे, योगासने करणे सुरू ठेवा. स्वतःसाठी आवर्जून वेळ काढा.

* एकमेकांची प्रशंसा करा. छोट्या-छोट्या गोष्टींसाठी जोडीदाराचे कौतुक करणे गरजेचे आहे. यामुळे नाते मजबूत होते आणि सकारात्मक ऊर्जा राहते.

* आठवड्यातून एकदा डेटची योजना करा. चित्रपट पाहा. बाहेर जेवा किंवा एकत्र काहीतरी नवीन करा. यामुळे कंटाळा येणार नाही.

## ...म्हणून प्रतिजैविकांचा परिणाम शून्य

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटीबायोटिक्स घेत असाल तर काळजी घ्या कारण प्रतिजैविक प्रतिरोधकतेमुळे जगभरात ३० लाखाहून अधिक मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. व्हिएन्ना येथे सादर केलेल्या एका संशोधनातून ही बाब उघड झाली आहे. दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या प्रतिजैविकांच्या वापरावरही या संशोधनाने चिंता व्यक्त केली आहे.


२०१९ ते २०२१ दरम्यान दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेत प्रतिजैविकांचा वापर झपाट्याने वाढल्याचे सदर संशोधनात म्हटले आहे. या काळात दक्षिण पूर्व आशियामध्ये १६० टक्के तर आफ्रिकेत १२६ टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे राखीव प्रतिजैविकांचा

आरोग्यचर्चा
**डॉ. अजेय गर्जे**

वापर दक्षिण पूर्व आशियामध्ये ४५ टक्के आणि आफ्रिकेत १२५ टक्क्यांनी वाढला आहे. प्रतिजैविकांचा हा वाढता वापर गंभीर चिंतेची बाब आहे. लोक स्वेच्छेने अँटिबायोटिक्स घेत आहेत. त्यामुळे अँटी-मायक्रोबियल रेझिस्टन्सही झपाट्याने वाढत आहे.

प्रतिजैविक प्रतिकार म्हणजे काय?

कोणत्याही रोगास कारणीभूत असणारे जीवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिजैविकांना प्रतिकार करण्याची क्षमता विकसित करतात. परिणामस्वरुप त्या जिवाणू वा विषाणूने संक्रमित रुग्णावर उपचार करणे अत्यंत कठीण होते. यामुळे जगभरात ३० लाखांहून अधिक मुलांचा मृत्यू झाला असल्याचे ही जागतिक आकडेवारी सांगते. असे असले तरी हा प्रतिकार मोडून काढण्यासाठी औषधांचा विकास संथ गतीने होत आहे. त्यामुळेच दक्षिण पूर्व आशिया आणि आफ्रिकेसारख्या देशांमध्ये परिस्थिती अशीच राहिली तर परिणाम अत्यंत भीषण होऊ शकतात.




सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक्स टाळा

संशोधनात म्हटले आहे की, राखीव प्रतिजैविके उपचारांच्या पहिल्या टप्प्यासाठी नाहीत. ही औषधे फक्त आणीबाणीसाठी ठेवावीत. स्वतः मनाने अँटिबायोटिक्स घेतात त्यांनी ही सवय त्वरित सोडली पाहिजे. प्रतिजैविक घेण्याचे काही नियम आहेत. ते पाळले नाहीत तर रुग्णाच्या शरीरातील जिवाणू आणि विषाणू स्वत:मध्ये प्रतिरोधक क्षमता विकसित करतात. अशा परिस्थितीत भविष्यात रुग्णाला असाच आजार झाला तर उपचार करणे कठीण होते.

प्रतिजैविक गोळ्या खाल्याने पोटात दुखणे, उलटी आणि अतिसार यांचा समावेश आहे. त्यामुळे भविष्यात संसर्गावर उपचार करणे कठीण होऊ शकते.

## आता पाहायला मिळतोय मधुमेहाचा टाईप-५

आजकाल मधुमेहामुळं तरुण वयातही अनेकांना नानाविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मधुमेहाचे टाइप-१ आणि टाइप-२ असे दोन प्रकार असतात हे आपण जाणतो. परंतु या दोन मधुमेहाव्यतिरिक्त लोकांना टाइप ५ नावाच्या मधुमेहाचाही त्रास होऊ शकतो. नुकतेच मधुमेहाबाबत संशोधन करणाऱ्या 'वर्ल्ड काँग्रेस ऑफ डायबिटीज २०२५' ने टाइप-५ नामक मधुमेहाच्या नवीन स्वरूपाची घोषणा केली आहे. एक जागतिक टास्क फोर्स या दुर्मीळ स्थितीची तपासणी करत असून हा प्रकार टाइप-१ आणि टाइप- २ मधुमेहापेक्षा खूप वेगळा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.



'इटरनॅशनल डायाबेटीज फडरेशन'चे अध्यक्ष प्रोफेसर पीटर श्वार्झ यांनी बँकॉकमध्ये आयोजित झालेल्या एका चर्चासत्रात याची घोषणा केली. टाइप-५ मधुमेह कमी वजन असणाऱ्या लोकांना प्रभावित करतो. त्याचबरोबर कुटुंबात मधुमेहाचा कोणताही इतिहास नसणाऱ्या तसेच टाइप-१ किंवा टाइप -२ मधुमेहाची सामान्य लक्षणे नसणाऱ्यांनाही हा मधुमेह होण्याची शक्यता असते.

महत्त्वाचा फरक

टाइप-५ मधुमेह असणारे लोक सामान्यतः कमी वजनाचे असतात. या लोकांमध्ये इन्सुलिनची कमतरता असते तसेच ते इन्सुलिन प्रतिरोधकही असते. हा एक महत्त्वाचा फरक म्हणावा लागेल. म्हणजेच शरीर पुरेसे इन्सुलिन तयार करतही करत नाही आणि इन्सुलिनच्या क्रियेला प्रतिकारही करते. म्हणूनच मधुमेहाचा हा प्रकार अधिक त्रासदायक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

आरोग्यभान
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

## पोटावर झोपणे टाळा


दिवसभर दमछाक झाल्यानंतर घरी आल्यावर बिछान्यात पडून लोळावंसं वाटतं. आपण अक्षरश: आडवे पडतो. कसेही झोपतो. पण यामुळे पाठीच्या कण्याला त्रास होऊन पाठीचं किंवा मानेचं दुखणं उद्भवू शकतं. त्यामुळे आपल्या शारीरिक स्थितीकडे नेहमी लक्ष द्यायला हवं. आपण वेगवेगळ्या स्थितीत झोपतो. याचा परिणाम झोपेवरही होऊ शकतो. मात्र एका ठराविक स्थितीत झोपू नये, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अनेक जण पोटावर झोपतात. पण असं झोपणं त्रासदायक ठरू शकतं. पोटावर झोपून पुस्तक वाचणं, मोबाईल, लॅपटॉपचा वापर करणं किंवा फक्त झोपणंही पाठ आणि पोटाच्या आरोग्यासाठी घातक आहे.

मध्यंतरी कॉलेजमधल्या मुलांच्या झोपण्याच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला. जवळपास १५ टक्के मुलं पोटावर झोपून लॅपटॉप, मोबाईलचा वापर करत असल्याची बाब यातून समोर आली आहे. पोटावर झोपल्यामुळे पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक बाकात बदल होऊन पाठ आणि मानेची दुखणी उद्भवू शकतात. इतकंच नाही तर सतत पोटावर झोपल्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येऊन बराच त्रास होऊ शकतो. पोटावर झोपून मोबाईल/लॅपटॉपचा वापर करणाऱ्यांना पाठीची दुखणी त्रास देऊ शकतात, असंही एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे अशा स्थितीत झोपणं टाळायला हवं.

## कर्करोगाचा मेंदूवरही परिणाम

कर्करोगाचे निदान होताच बहुतेक लोक त्याच्याशी लढण्याचे धैर्य गमावतात. मात्र चौथ्या टप्प्यातही या आजारावर उपचार करणे शक्य असते, हे लक्षात घ्यायला हवे.

एका संशोधनात समोर आले आहे की, कर्करोग शरीराच्या प्रभावित भागावरच नाही तर मेंदूवरही हल्ला करतो. 'सायन्स मेगॅझिन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात कर्करोगाचा मेंदू आणि मज्जासंस्थेवर कसा परिणाम होतो हे सविस्तर सांगितले आहे. परिणाम शोधण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आले. सदर संशोधनातून आश्चर्यकारक निष्कर्ष समोर आले. कर्करोगाचा टप्पा वाढत जातो तसतसा हा आजार रुग्णाच्या मनाशी खेळू लागतो, असे या अभ्यासातून समजले.



आरोग्य जपा
**डॉ. सतीश सोनवणे**

कर्करोग काय करतो?

हा आजार रुग्णाची इच्छाशक्ती आणि जगण्याची प्रेरणाच नष्ट करतो. त्यामुळे उपचार आणि योग्य पोषण असूनही रुग्ण अशक्त होतो. त्याची प्रकृती बिघडते. उंदरांवर केलेल्या संशोधनातून दिसून आले आहे की, कर्करोग मेंदूच्या विशिष्ट भागातील मज्जासंस्थेवर वाईट परिणाम करतो. या संशोधनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि उपकरणे वापरण्यात आली. ही उपकरणे संपूर्ण मेंदूची प्रतिमा बनवू शकतात आणि मेंदूतील सूक्ष्म हालचालींचेही अचूक निरीक्षण करू शकतात.

संशोधनात काय?

संशोधनात आढळल्यानुसार कर्करोग वाढत गेला तसतसे उंदरांनी अन्न मिळवण्याचे प्रयत्न कमी केले. अवघड कामे पूर्णपणे बंद झाली. मज्जासंस्थेद्वारे मेंदूमध्ये तयार होणाऱ्या डोपामाइन या रसायनाची पातळीही कमी झाल्याचे संशोधनातून समोर आले आहे. हे रसायन प्रेरणा स्त्रोत असून ते एखाद्या व्यक्तीमध्ये इच्छाशक्ती जागृत करते. कर्करोगाच्या चौथ्या टप्प्यातील उपचारादरम्यान रुग्ण जगण्याची आशा गमावून बसतो, असे या संशोधनातून समोर आले आहे. म्हणूनच उपचार योग्य दिशेने सुरू असतानाही तो प्रतिसाद देत नाही आणि मृत्यू स्वीकारतो. सुरुवातीला ही प्रदीर्घ आजारामुळे झालेली मानसिक स्थिती मानली जात होती. परंतु संशोधनानंतर स्पष्ट झाले की कर्करोग शरीरावरच नव्हे तर मनावरही हल्ला करतो आणि रुग्णाची जगण्याची इच्छाच नष्ट करतो.

नवसंशोधन

### भारतीयांचा मेंदू लहान

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी हैदराबादच्या शास्त्रज्ञांनी भारतीयांच्या मेंदूचा नकाशा तयार केला आहे. हा अशाप्रकारचा पहिलावहिला नकाशा आहे. भारतीयांचा मेंदूचा आकार इतरांच्या तुलनेत लहान असल्याची बाब या संशोधनातून समोर आली आहे. पाश्चिमात्य देश तसंच पूर्वेकडच्या इतर देशांमधल्या लोकांच्या तुलनेत भारतीयांच्या मेंदूचा आकार बराच लहान असतो. या संशोधनामुळे अल्झायमर तसंच मेंदूशी संबंधित इतर विकारांवरील उपचारांना गती मिळू शकते.



या प्रस्तावावर काम करणाऱ्या सेंटर फॉर व्हुजअल इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयंत सिवास्वामी यांच्या मते, मेंदूशी संबंधित आजार शोधण्यासाठी मॉन्ट्रियल न्यूरॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (MNI) टेम्पलेटचा उपयोग केला जातो.

दंतारोग्य

### दात पांढरेशुभ्र होतात का?

दातांचा पांढरेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रक्रिया केल्या जातात. दातांचा पिवळेपणा दूर करणाऱ्या प्रक्रियेबाबत बरेच गैरसमज आहेत. या प्रक्रियेनंतर दात पांढरेशुभ्र होतात, असा समज असतो. मात्र या प्रक्रियेचे लाभ व्यक्तीगणिक बदलत जातात. डागांचे प्रकार, दातांवरच्या एनामेलचा थर, दातांची क्षमता यावर बरंच काही अवलंबून असतं. त्यामुळे दात पूर्ण पांढरे होतीलच असं नाही.



केळ्याच्या सालीमध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशियलम, मॅग्नेशियम असते. या गोष्टीचा उपयोग ब्लिचिंग एजंट म्हणून करण्यात येऊ शकतो. त्यामुळे केळ्याचे साल दातांवर घाऊसू शकता.

डोळ्यांचे आरोग्य

### डोळे दुखत असतील तर...

लॅपटॉप आणि कॉम्प्युटरचा वापर केल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो. डोळे दुखू लागतात. मात्र काही उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो. सतत स्क्रीनपुढे राहिल्याने डोळे दुखू लागले तर डोळ्यांवर थंड पाण्याचे हबके मारावे. योगामुळेही आराम मिळू शकतो. आहारात डाळी, हिरव्या भाज्या, गाजर यांचा समावेश असावा. स्क्रीन टाईम मर्यादित करा आणि मध्ये ब्रेक घ्या. अश्रू निर्माण करण्यासाठी चांगले हायड्रेटेड वापरा.



वाचताना किंवा डिजिटल उपकरणे वापरताना योग्य प्रकाशयोजना सुनिश्चित करा. उन्हाळ्यात योग्य सनग्लासेस वापरा.

आजीबाईचा बटवा

### शिळी पोळी आहे गुणकारी

शिळ्या किंवा उरलेल्या पोळ्यांची फोडणीची पोळी केली जाते. मात्र बऱ्याच घरांमध्ये अशा उरलेल्या पोळ्या टाकून दिल्या जातात. अर्थात या शिळ्या पोळ्या अधिक लाभदायी ठरतात. शिळ्या पोळ्यांमध्ये विविध आजार बरे करण्याची क्षमता असते. या पोळ्यांमध्ये ताज्या पोळ्यांच्या तुलनेत प्रथिनांचं प्रमाणही अधिक असतं. शिळ्या पोळ्यांमुळे रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात रहाते. मधुमेहींना सकाळच्या वेळी दुधासोबत शिळी पोळी खाता येईल. शिळ्या पोळीच्या सेवनामुळे रक्तदाबही नियंत्रणात रहातो. त्यामुळे शिळी पोळी टाकून देऊ नये. पचनक्रियेसाठी शिळी पोळी खूप फायदेशीर आहे. गॅस, पोट फुगणे या पोटाशी संबंधित समस्यांवर रामबाण उपाय आहे.



### भारती विद्यापीठ आयोजित गणित व इंग्रजी परीक्षेत

# नगरच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थिनी राजनंदनी गायकवाड व हाजरा खान राज्यात चमकल्या



नगर – भारती विद्यापीठातर्फे फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या गणित व इंग्रजी बहि:स्थ परीक्षेत शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील दोन विद्यार्थीनी राज्य गुणवत्ता यादीत चमकल्या. यामध्ये इ. ४ थी मधील गणित परिचय परीक्षेमध्ये राजनंदनी सागर गायकवाड हिने १०० पैकी ९८ गुण मिळवून राज्यांमध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्याचबरोबर इ. ५ वीतील इंग्रजी प्री प्रायमरी परीक्षेत हाजरा जावेद खान या विद्यार्थिनीने १०० पैकी ९८ गुण मिळवून राज्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजय मुनोत, विनोदकुमार कटारिया तसेच सर्व विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी व सर्व शिक्षकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त निमगाव वाघा येथे १४ मे रोजी ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन

### गावातून छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्याची निघणार ग्रंथ दिंडी



नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त १४ मे रोजी ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन होत असून, राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी या सोहळ्यास उपस्थित राहणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

छत्रपती संभाजी महाराज हे स्वयं उत्कृष्ट साहित्यिक होते. त्यांनी विविध भाषांचे सखोल अध्ययन केले होते तसेच अभ्यासपूर्ण ग्रंथनिर्मितीही केली होती. त्यांच्या कार्यातून नवोदित साहित्यिकांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी गावातून छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. यानंतर परिवार मंगल कार्यालयात संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्रीचेही आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनाच्या समारोपीय सत्रात सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी प्रस्ताव ७ मे पर्यंत पै. नाना किसन डोंगरे, अध्यक्ष, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, निमगाव वाघा, ता. नगर, जि. अहिल्यानगर – ४१४००५. या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२२६७३५३४६ / ८६०५७७५२६१.

# परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित दुचाकी रॅली व शोभायात्रा



परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित आयोजित दुचाकी रॅली व शोभायात्रा.

नगर – सकल ब्राह्मण समाज सेवा संस्था महासंघ व परशुराम प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित ऋग्वेद भवन, चितळे रोड ते रेणुका माता मंदिर, प्रोफेसर कॉलनी चौक अशी दुचाकी रॅली व रेणुका माता मंदिर ते भिस्तबाग चौक अशी पायी शोभायात्रा काढण्यात आली होती. यामध्ये सजविलेल्या अश्व रथावर भगवान परशुरामांच्या पादुका, भगवान परशुरामांची उत्सव मूर्ती व भगवान परशुरामांची सजवलेली प्रतिमा ठेवण्यात आली होती. अश्वारूढ झालेल्या ब्राह्मण भगिनी, महिला व पुरुष, ब्रह्मवृंद, सकल ब्राह्मण समाज सेवा संस्था महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पोतदार, परशुराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, प्रभाताई भोंग, वे शा सं निसळ गुरू, अतुल शुक्ल, श्रीया देशमुख, सार्थक भोंग, राजाभाऊ जोशी, किरण वैकर, अरुण आवटी, शिरीष देशपांडे, अशोक कुलकर्णी, अनंत कुलकर्णी, कालिंदी केसकर, सुवर्णा महापुरुष, कांचन तांबोळी यांच्यासह अनेक परशुराम भक्त, तुतारी पथक, अब्दागिरी, भालदार, चोपदार, बँड पथक, शंखनाद पथक सहभागी झाले होते.

दिल्ली गेट येथून निघालेली ही मोटार सायकल रॅली बालिकाश्रम मार्गे भुतकरवाडी, लेंडकर मळा, प्रेमदान चौक मार्गे सावेडीतील रेणुका माता मंदिरात पोहोचली. भगवान परशुरामांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेच्या स्वागतासाठी बुधवारी सायंकाळी परशुराम भक्तांनी रस्त्याच्या दुतर्फा सडासम्मार्जन करून सुरेख रांगोळ्या काढल्या होत्या. त्याच बरोबर भगवान परशुरामाच्या पादुका व उत्सव मूर्तीचे पूजन व औक्षण करीत भगवान परशुरामाच्या रथावर पुष्पवृष्टी व फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

भगवान परशुरामांचे जन्मस्थळ असलेल्या जाणापाव (इंदोर, मध्य प्रदेश) येथून भार्गव दर्शन यात्रेच्या माध्यमातून आलेल्या पादुका परशुराम भक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्याच बरोबर भगवान परशुरामांची उत्सव मूर्ती व रेणुका माता यांची भेट घडविण्यात आली. रेणुकामाता मंदिर येथे अध्यक्ष मोहन कामत सर, प्रताप सर यांनी स्वागत केले. त्यानंतर रेणुका माता मंदिरापासून भिस्तबाग चौकापर्यंत पायी शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभा यात्रेमध्ये भगव्या साड्या परिधान केलेल्या महिला व भगवे नेहरू शर्ट व पायजमा असा वेष परिधान केलेले परशुराम भक्त, हातात भगवे झेंडे घेतलेले युवक व युवती देखील सहभागी झाल्या होत्या. तुतारीच्या निनादात, बँडच्या तालावर भगवान परशुरामांची गाणी म्हणत व जय परशुराम जय परशुराम अशा घोषणा देत ही शोभायात्रा भिस्तबाग चौकात येऊन पोहोचली. तिथे कु. रेणुकाताई निसळ यांचे प्रवचन झाले. आपल्या प्रवचनातून त्यांनी भगवान परशुरामांचे चरित्र सारांश रूपाने कथन केले. त्यानंतर भगवान परशुरामांच्या जन्मोत्सव सोहळ्यासाठी सहकार्य करणाऱ्या दानशूर व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रधान आचार्य वेदमूर्ती सिद्धेश्वर निसळ व प्रातिनिधिक स्वरूपातील परशुराम भक्तांच्या हस्ते भगवान परशुराम व श्री गणेशाची आरती करण्यात आली.

कार्यक्रमास नगरसेवक संपत बारस्कर, डॉ. सागर बोरुडे, सुनील त्र्यंबके, संपत नलावडे, बाळासाहेब पवार, शिवा चव्हाण, निखिल वारे, गोविंद जोशी, मनोज जोशी, प्रभावती भोंग यांच्यासह अनेक हिंदी भाषिक ब्राह्मण उपस्थित होते. कार्यक्रमात अनेक हिंदी भाषिक ब्राह्मण परिवार प्रथमच सहभागी झाले होते. राजाभाऊ पोतदार यांनी प्रास्ताविक केले. यशवंत आंबेकर यांनी सूत्रसंचालन केले. विजय देशपांडे यांनी आभार मानले.

सोहळ्याच्या यशस्वितेसाठी राजाभाऊ पोतदार, परशुराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, अतुल शुक्ल, श्रिया देशमुख, किरण वैकर, नरेंद्र श्रोत्री, शिरीष देशपांडे, अनंत कुलकर्णी, प्रभाताई भोंग, प्रमोद कुलकर्णी, योगेश दाणी व हिंदी भाषिक ब्राह्मण संस्था आदींनी परिश्रम घेतले.

# महापुरुषांच्या विचारांचे आचरण हीच खरी मानवंदना : अमोल भारती

### गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, भिंगार येथील पंचशील प्रतिष्ठानचा उपक्रम



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भिंगार येथील पंचशील प्रतिष्ठानने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून प्रेरणादायी उपक्रम राबविल्याबद्दल हरिभूमी प्रतिष्ठानच्यावतीने सागर चाबुकस्वार यांना पर्यावरण मित्र सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करताना शहर विभागाचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती. समवेत अभय ललवाणी व उल्हास नांगरे. (छाया – लहू दळवी)

नगर – आपल्या महाराष्ट्राला महापुरुषांच्या मार्गदर्शक विचारांचा अनमोल वारसा लाभलेला आहे. त्यामुळे आपल्या राज्याने विविध क्षेत्रात आपले भक्कम स्थान निर्माण केलेले आहे. महापुरुषांना अभिवादन करताना त्यांच्या विचारांचे आचरण हीच खरी त्यांना दिलेली मानवंदना आहे, असे प्रतिपादन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भिंगार येथील पंचशील प्रतिष्ठानने डीजे – ध्वनीक्षेपकाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. या पर्यावरणपूरक व कौतुकास्पद उपक्रमाबद्दल येथील हरीभूमी प्रतिष्ठानच्यावतीने पंचशील प्रतिष्ठानचे सागर चाबुकस्वार यांचा अमोल भारती यांचे हस्ते पर्यावरण मित्र सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. पंचशील प्रतिष्ठानने राबविलेल्या ध्वनी प्रदूषण व डीजेमुक्त अभिवादन उपक्रमाचे इतर मंडळांनी अनुकरण करावे असे आवाहन यावेळी श्री. भारती यांनी केले.

यावेळी हरिभुमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी म्हणाले की, सागर चाबुकस्वार व त्यांच्या सहकाऱ्यांनी डीजे ध्वनिक्षेपकाचा अनावश्यक खर्च टाळून शालेय विद्यार्थ्यांना केलेली मदत ही निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांचे हे प्रेरणादायी कार्य समाजापुढे यावे म्हणून त्यांना हे पर्यावरण मित्र सन्मानपत्र व पुष्पगुच्छ अमोल भारती यांच्या हस्ते प्रदान करण्यात येत आहे. यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल असे मत यावेळी उल्हास नांगरे यांनी व्यक्त केले.

# महिलेची छेडछाड करणाऱ्याला पकडले

नगर – पायी फेरफटका मारण्याकरिता गेलेल्या २९ वर्षीय महिलेकडे एकटक पाहून अश्लील हावभाव करुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन विनयभंग केल्याची घटना २ मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सावेडी उपनगरात पाईप लाईन रोड येथे घडली.

याबाबत पीडित महिलेने तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की ती महिला तिच्या बहिणीबरोबर रात्री जेवण झाल्यावर कॉलनी मध्ये फेरफटका मारीत असताना विनायक दत्तात्रेय नन्नवरे (रा. यशोदानगर कॉलनी, पाईपलाईन रोड) याने पीडित महिलेकडे एक टक नजरेने बघून त्याच्या हातातील प्लॅस्टिकचे पिशवी मधील काहीतरी वस्तू काढून तिच्याकडे पाहून अश्लील हावभाव करुन तिचा विनयभंग केला. त्यानंतर अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिला ठार मारण्याची धमकी दिली. तेव्हा त्या महिलेने डायल ११२ ला कॉल केला असता काही वेळात त्या ठिकाणी पोलीस आले व त्यांनी घटनेची माहिती घेऊन विनायक नन्नवरे यास ताब्यात घेतले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आहे पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन विनायक नन्नवरे यांच्याविरुद्ध भा न्या सं कलम ७९, ३५२, ३५१(२) ३५१(३) प्रमाणे विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास महिला पोलीस हवालदार प्रियंका राऊत या करीत आहे.

# फायटर जेटमधून पडलेला जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी

### खा. निलेश लंके यांच्या सुचनेची लष्करी अधिकाऱ्यांकडून दखल



राहुरी कृषि विद्यापीठ परिसरात फायटर विमानातून पडलेला बॉम्ब लष्करी तज्ञांकडून निकामी करण्यात आला.

नगर – राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या परिसरात फायटर जेट विमानामधून पडून जमिनीमध्ये सात फुटांवर रूतून बसलेला जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी करण्यात आला. यासंदर्भात खा. निलेश लंके यांनी लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा बॉम्ब निकामी करण्याच्या सुचना दिल्या होत्या. या सुचनांची दखल घेत लष्कराकडून १ मे रोजी हा बॉम्ब निकामी करण्यात आला.

वरवंडी येथे फायटर जेट विमानातून हा बॉम्ब पडून जमीनीमध्ये रूतल्याने शेतकऱ्यांच्या जल वाहिन्या फुटल्या. त्यामुळे शेतांमधील पीके जळण्याची वेळ आली होती. सात दिवस उलटूनही बॉम्ब हटविण्यासंदर्भात काहीही कार्यवाही झाली नव्हती. खासदार निलेश लंके यांच्या ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी स्टेशन कमांडर आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या समवेत पार पडलेल्या बैठकीत हा बॉम्ब निकामी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.

या बैठकीत नागरीकांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे यावेळी मान्य करण्यात आले होते. १ मे रोजी लष्करी तज्ज्ञांच्या पथकाने हा जिवंत बॉम्ब सुरक्षितपणे काढून तो आपल्या ताब्यात घेतला. हा बॉम्ब निकामी करण्यात आल्याची माहीती स्टेशन कमांडर यांनी खा. लंके यांना दिली. हा बॉम्ब निकामी करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांना तसेच नागरीकांना मोठा दिलासा मिळाला असून एक संभाव्य आपत्ती टळली आहे. या घटनेनंतर लष्करी हददीतील समस्या, शैक्षणिक गरजा आणि मंदीर विकास आदी प्रश्नांवरही लवकरच तोडगा निघेल अशी अपेक्षा आहे.

# सामाजिक संस्थांतील मुलांनी घेतला 'आंबे खाण्याचा' आस्वाद

### निरंजन सेवाभावी संस्थेचा अभिनव उपक्रम, चांगल्या उपक्रमांसाठी समाज नेहमीच सहकार्य करेल – सिद्धि जौहरी



निरंजन सेवाभावी संस्थेच्यावतीने सामाजिक संस्थेतील मुला–मुलींसाठी आंबे खाण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – अनेक संस्था समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काम करत आहेत. अनाथ मुला–मुलींना आधार देण्यासाठी त्यांचे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशिल आहेत. अशा संस्थांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून निरंजन सेवाभावी संस्था काम करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. आज सामाजिक संस्थांतील मुलांना आंबा खाण्याची स्पर्धेचा उपक्रम राबवून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच विविध उपक्रमातून मदतीचा हात दिला जातो. अशा उपक्रमामुळे त्यांचा विकास होण्यास नक्कीच मदत होणार आहे. चांगल्या उपक्रमांसाठी समाज नेहमीच सहकार्य करेल. सामाजिक संस्थांच्या उन्नत्तीसाठी प्रत्येकाने आपआपल्यापरीने वाटा उचलावा, असे प्रतिपादन मिसेस इंडिया इंटरनेशनल विजेती सिद्धि जौहरी यांनी केले.

निरंजन सेवाभावी संस्थेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे सामाजिक संस्थेतील मुला–मुलींसाठी आंबे खाण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मधुसुदन गांधी, प्रदेश सचिव सत्यनारायण सारडा, उद्योजक अनुराग श्रीवास्तव, सिद्धि जौहरी, दिनेश सोलानी, पुरुषोत्तम रादंट, उद्योजक जितेंद्र बिहाणी, श्रद्धा बिहाणी आदि उपस्थित होते.

उद्योजक जितेंद्र बिहाणी म्हणाले की, निरंजन सेवाभावी संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे उत्कृष्ट काम सुरु असून त्यांचा पुर्ण वर्षभराचा कार्यक्रम हा ठरलेला असतो. आजच्या या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहूण आम्हाला समाधान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मधुसुदन गांधी म्हणाले की, निरंजन सेवाभावी संस्था यांचे कार्य राज्यामध्ये उत्कृष्टपणे सुरु असून या संस्थेचा कोणी अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी नाही, त्यामुळे श्रेयवाद घेण्याचा प्रश्नच नाही. सर्व एकत्र राहुन एकदिलाने काम करत आहे. त्यांच्या या कार्याबद्दल प्रदेशचा उत्कृष्ट पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी जो उपक्रम राबविला आहे. तो खरोखरच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी अतुल डागा म्हणाले, निरंजन संस्थेच्यावतीने नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. यंदाच्यावर्षी संस्थेने अनेक मुला–मुलींचे पालकत्व घेत त्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याचबरोबरच संस्थेच्या सभासदांच्या आनंदक्षणी मिष्ठान्न भोजन अशा संस्थेतील मुलांना दिले जाते. आजही अशा सामाजिक संस्थेतील मुलांना मनसोक्त आंबे खाण्याचा आनंद मिळवून दिला असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन प्रा.प्रसाद बेडेकर यांनी केले. मुकूंद धुत यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे स्वप्निल कुलकर्णी, निलेश बिहाणी, विशाल झंवर, अभिजित बिहाणी, राहुल झंवर, सुमित चांडक, सुहास चांडक, हरिष काबरा, संजय पूगालिया, महेश चांडक, दीपक काबरा, अर्चना पुगलिया, प्राजक्ता डागा, योगिता कुलकर्णी, पूनम चांडक, सविता झंवर, संगीता सिकची, दीपिका चांडक, जया बिहानी आदिंनी परिश्रम घेतले.



तुंगभद्रा येथून पवित्र जल आणलेल्या कावडीचे विजय भालसिंग यांनी सपत्निक स्वागत केले.

# तुंगभद्रा येथून पवित्र जल आणलेल्या कावडीचे स्वागत

नगर – वाळकी (ता. नगर) येथील सद्गुरु महेंद्रनाथ यांच्या चतुर्थ समाधी सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशातील श्री क्षेत्र मंत्रालय (आंध्रप्रदेश) येथील तुंगभद्रा नदीतील पवित्र जल घेऊन आलेल्या नाथ संप्रदायाच्या कावड यात्रेचे बनपिंपरी (ता. श्रीगोंदा) येथे विजय भालसिंग यांनी सपत्निक स्वागत केले. या वेळी नाथ भक्त उपस्थित होते.

रविवारी (दि. ४ मे) वाळकी येथे नाथ भक्तांनी श्रीराम मंदिरात धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. ६०० किलोमीटर पायी चालत तुंगभद्रा नदीतील पवित्र जल घेऊन आलेल्या कावड यात्रेची मिरवणुक काढण्यात येणार आहे. श्रीराम मंदिरात सद्गुरु महेंद्रनाथ यांच्या समाधीस्थळी कावडने आणलेल्या तुंगभद्राच्या पवित्र जलाने महाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर होमहवनाचा धार्मिक कार्यक्रम पार पडेल. सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनकार ह.भ.प. रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन नाथ संप्रदायातील भक्तांनी सर्व ग्रामस्थांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्याच्या काही भागात ३ ते ६ मे दरम्यान पावसाचा हवामान खात्याचा अंदाज

नगर – जिल्ह्याच्या काही भागात ३ ते ६ मे या कालावधीत वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा व हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१– २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

